निबंध
२८७
१०१२८९
अंदमेशिरव
२३०८३

# बलात्कार : गुन्हा आणि त्याचा बळी

मराठी ग्रंथ संग्रहालय ठाणे
२८७
ग्रा. क्र. १०१२८९
निबंध
मुंबई शाखा (स्थान प्रत)

लेखक : चंद्रशेखर वाघ

REFBK-0023083

विराट प्रकाशन, मुंबई

REFBK-0023083

# १९८० : बलात्काराचे वर्ष

मध्य प्रदेशातील नंदिनी येथील पोलिस ठाणे. रुक्मिणी नावाच्या एका हरिजन स्त्रीला पोलिसांनी ठाण्यातच बेदम मारहाण केली आणि तिथेच तिला विवस्त्र करण्यात आले. दुसऱ्याच क्षणी तिच्या चौदा वर्षांच्या मुलाला पोलिसांनी आत आणले आणि आपल्या नागडच्याउघडच्या आईकडे बोट दाखवून पोलिसांनी निर्लज्जपणे त्या अजाण मुलाला आपल्या आईवरच बलात्कार करण्यास फर्मावले. तेहतीस वर्षांची रुक्मिणी त्यावेळी तीन महिन्यांची गरोदर होती. पोलिसांच्या हातून बेदम मार खाण्यापेक्षाही तिला या प्रकाराने मेल्याहून मेल्यासारखे झाले असेल. या साऱ्या प्रकरणात निर्लज्जपणाचा कळस म्हणजे पोलिस ठाण्यातील महिला पोलिसांनीच रुक्मिणीच्या अब्रूवर घाला घालण्याच्या 'पराक्रमात' आपल्या सहकारी पुरुष पोलिसांना हातभार लावला. दुर्योधनाच्या भर राजसभेत द्रौपदीचे वस्त्रहरण करणारे नराधम पुरुष होते. पण आज विसाव्या शतकातील स्वतंत्र भारताच्या एका पोलिस ठाण्यावर एका अगतिक महिलेचे वस्त्रहरण काही महिलाच करीत होत्या. आणि रुक्मिणीच्या वयात येऊ लागलेल्या मुलालाच आपल्या आईच्या विवस्त्र देहाची विटंबना करण्यास भाग पाडीत होत्या!

१८ जून १९८० ची ही घटना वर्तमानपत्रात प्रसिद्ध झाली. रोज घडणाऱ्या व वर्तमानपत्रातून प्रसिद्ध होणाऱ्या जागोजागच्या बलात्कार प्रकरणांपैकीच एक म्हणून लोकांचेही त्याकडे दुर्लक्ष झाले. काही दिवसांनी रुक्मिणीनेच आपल्या दुर्दैवाचे दशावतार वार्ताहारांना कथन केले. त्यात ती म्हणते, "बेदम मारहाणीमुळे मला रक्तस्राव होऊ लागला. पोलिसांनी माझ्या अंगावरचे सारे कपडे ओरबाडून काढले. माझ्या उघडच्या अंगाकडे हावऱ्या नजरेने पोलिस पाहात असतानाच तिथल्या पोलिस बायांनी माझ्या त्रिनाथाला आत आणले. माझ्या उघडच्यावागडच्या अंगाकडे बोट दाखवून त्याला नको त्या गोष्टी करण्यास दरडावले. पोलिसांनी त्रिनाथाला काय सांगितले ते मी तुम्हांला कसं सांगू? त्यांनी फार ओंगळ शब्द वापरले. हे चालू असतानाचं बायांसाठी लावलेला पडदा बायका पोलिसांनी बाजूस

सारला आणि त्या बाहेरच्या अन्य पोलिसांना हाक मारू लागल्या, " गंमत बघायचीय तुम्हाला? फुकटात नाटक बघायचंय ? "

मध्य प्रदेशातील ही रुक्मिणी काय, बागपतची माया त्यागी, नागपूरची मथुरा, सीमा, दर्शना, हैद्राबादची रमीझाबी आणि आणखी कितीतरी! यांच्यावर झालेल्या अत्याचारांच्या प्रकरणी काही थोडक्या लोकांच्या जागरूकपणामुळे आणि काही राजकारणी मंडळींना हवी होती म्हणून वाचा तरी फुटली, देशात त्या त्या वेळी खळबळ माजली, भारतात कायदा, सुव्यवस्था आणि स्त्रीची अब्रू सुरक्षित नसल्याचे आरोप–प्रत्यारोप काही दिवस केले गेले आणि वाफ खाली बसताच 'ना खंत ना खेद' या वृत्तीने समाजाचे सारे व्यवहार पूर्ववत सुरळितपणे चालू राहिले. जागोजाग महिलांवरील अत्याचारही त्याच निर्ढावलेपणाने होत राहिले.

१९८० साल हे सामूहिक बलात्काराचे वर्ष म्हणून मानावे लागेल. केवळ सामूहिक बलात्काराचेच नव्हे, तर समाजाच्या सुरक्षिततेचे रखवालदार म्हणून ज्यांच्याकडे विश्वासाने पाहावे, त्या पोलिसांकडून आपल्या मायभगिनींवर बिनदिक्कतपणे, 'जनामनाची कोणतीही लाजलज्जा न बाळगता' अत्याचार होतात याचेही मन विषण्ण करणारे दर्शन एकोणीसशे ऐंशी इतके पूर्वी केव्हाही झाले नसेल. 'कामातुराणां न भयं न लज्जा' या वचनाचे प्रत्यंतर जागोजाग घडलेल्या वासना–कांडातून जळजळीतपणे आले आणि मनाला चीड आणणारी त्याहून भयानक गोष्ट म्हणजे एवढे सारे होत असूनही समाजात त्याबद्दल म्हणावी अशी परिणामकारी कोणतीही प्रतिक्रिया झाली नाही. चारआठ दिवस शिरा ताणून बोलण्याची संधी काही बोलभांड मंडळींना मिळाली. बस्स्, इतकेच.

उत्तर प्रदेशातील नारायणपूर येथे घडलेला अत्याचार या संदर्भात अभ्यासण्यासारखा आहे. नारायणपूरजवळ एका खाजगी बसगाडीचा धक्का लागून एक म्हातारी ठार झाली. शेजारच्याच कॅप्टनगंज येथील पोलिस ठाण्याचा फौजदार या अपघाताच्या चौकशीसाठी नारायणपूरला आला. पण गावकऱ्यांनी त्याला दाद न देता मारहाण करून गावातून हाकलून दिले. आणि मग येथून त्या पोलिस फौजदाराच्या सूडाचा सैरावैरा प्रवास सुरू झाला. अपमानित झालेला फौजदार नारायणपूरला परतला, तो आपली

पोलिस शिपायांची फौज घेऊनच. त्यांनी गावकऱ्यांना बांधले आणि बेदम मारहाण केली. एवढ्यानेच त्यांचा सूड शमला नाही. त्यांनी गावातल्या बायकांवर त्यांच्या बापांसमोर, नवऱ्यांसमोर, मुलांसमोरच बलात्कार केले. एकामागून अनेकांनी, आणि त्यातून कोणीही सुटली नाही. वयातही न आलेल्या मुली, किशोरी, तरुण स्त्रिया आणि साठी उलटलेल्या म्हाताऱ्यादेखील !

१४ जानेवारी १९८० रोजी एवढा भयानक प्रकार होऊनही नारायणपूरच्या बाहेर कोणाला त्याची गंधवार्ता नाही. पोलिसांची एवढी दहशत बसलेली, की शेजारच्या गावातील आपल्या नातलगांनाही झाल्या प्रकाराची खबर देण्याचे धाडसही गावकऱ्यांना दाखवता आले नाही. पुरुषांची जिथे ही स्थिती तिथे बायका काय करणार? या प्रकारानंतरही आपणास टाकून दिले नाही हेच एक समाधान त्यांना वाटत असेल.

नारायणपूरचा हा अत्याचार कधी प्रकाशातही आला नसता, पण गोरखपूर येथील 'जागरण' या एका छोट्या हिंदी दैनिकाच्या वृत्तसंपादकाच्या जागरूकतेने या प्रकारास वाचा फुटली. गोवारीप्रसाद या एका किसान पुढाऱ्याने नारायणपूर प्रकरणी निषेध करणारे छोटेसे निवेदन साऱ्याच वृत्तपत्रांकडे पाठविले असणार; पण मन बधीर झालेल्या कोणाही पत्रकाराला या घटनेची अधिक दखल घेण्याची जरूरी वाटली नाही. 'जागरण'च्या तदितकुमार यांना मात्र ते पत्रक वाचताच कुठे तरी अस्वस्थ वाटू लागले; 'माझ्या अंतःकरणात एक असह्य कळ आली आणि मी माझ्या एका सहकाऱ्याला नारायणपूरला पाठविले' असे ते सांगतात. 'जागरण' हे स्वतःचे नाव सार्थ करणाऱ्या या वर्तमानपत्राच्या वार्ताहराला नारायणपूरची हकीकत मिळवायला बरेच कष्ट पडले खरे; पण त्याने मोठ्या कौशल्याने गावकऱ्यांच्या मनातील भीती दूर करण्यात आणि त्यांना बोलते करण्यात यश मिळविले आणि त्यातून नारायणपूर कांड उजेडात आले, आणि तरीसुद्धा नारायणपूरमध्ये झालेल्या सामूहिक बलात्काराची मोठमोठ्या वर्तमानपत्रांना दखल घ्यावीशी वाटली नाही. पंतप्रधान इंदिरा गांधींनी मात्र अतिशय 'जागरूक'तेने गोरखपूरच्या वर्तमानपत्रातील या बातमीची दखल घेतली. त्यांच्या नारायणपूर–भेटीमुळे मात्र मुर्दाड बनलेल्या वर्तमानपत्री जगात हालचाल सुरू झाली आणि नारायणपूरवर रकानेच्या रकाने भरून

मजकूर छापून येऊ लागला. पंतप्रधान इंदिरा गांधींची ही जागरूकता नंतर मात्र कधी प्रत्ययास आली नाही. नारायणपूर प्रकरणाने इंदिराबाईंच्या भावनेला हात घातला, कारण त्यावेळी तेथे बनारसीदासांचे विरोधी पक्षीय सरकार होते. राजकीय गरजेपोटीच इंदिराबाईंना तेव्हा नारायणपूरला धाव घ्यावीशी वाटली. अलीकडे अलीकडे खळबळ माजविणाऱ्या बागपत प्रकरणी नाराजीचा, निषेधाचा एक शब्दही उच्चारण्याची इंदिरा गांधींना गरज वाटली नाही; उलट बागपत येथे माया त्यागींवर पोलिसांकडून झालेल्या अत्याचाराचे विरोधी पक्ष राजकीय भांडवल करीत आहेत, असा आरोप मात्र इंदिराबाईंनी केला. इंदिरा गांधींनी केलेल्या या आरोपात मुळीच तथ्य नाही, असे मात्र नाही; कारण राजकारणातील विदूषक म्हणून ख्याती पावलेल्या राजनारायण यांनी ज्या प्रकारे माया त्यागीचा स्वतःच्या प्रसिद्धीसाठी उपयोग करून घेतला, तो पाहता बागपत प्रकरणात राजकारणी नेत्यांनी घातलेल्या गोंधळामुळेच 'माया त्यागीची विवस्त्र धिंड आणि सात-आठ पोलिसांनी भर पोलिस चौकीत तिची लुटलेली अब्रू, मागे पडली आणि 'राजकीय भांडवल करण्याचा प्रयत्न' केल्याचे आरोप एकमेकांवर सुरू झाले. राजकीय पुढाऱ्यांना आपल्या पक्षीय स्वार्थापुढे महिलांवरील अत्याचारांचीही मुर्वत वाटत नाही. बागपत आणि नारायणपूर या दोन्ही प्रकरणांनी या वस्तुस्थितीचे दारुण दर्शन घडविले आहे. नारायणपूर कांड घडले तेव्हा उत्तर प्रदेशात चरणसिंगांच्या चेल्यांचे–बनारसी दासांचे–राज्य होते. म्हणून तिथल्या अवमानित, अत्याचारित महिलांचा आक्रोश चरणसिंगांना ऐकू गेला नाही. आणि बागपताला माया त्यागीची अब्रू पोलिसांनी लुटली तेव्हा उत्तर प्रदेशात संजयच्या चेल्याचे–विश्वनाथ प्रतापसिंगांचे–राज्य असल्याने संजयच्या मातेला माया त्यागीचे आक्रंदन ऐकू गेले नाही. राजनारायण यांना नेहमीच काहीतरी खेळणे हातामध्ये हवे असते. बागपत कांडाने माया त्यागी त्यांना आयतीच सापडली. त्यांनी शानदार मंडप घालून मऊ गाद्यांच्या राशीवर मांडी ठोकून उपोषण काय केले आणि त्या ठिकाणी माया त्यागीला आणवून तिच्याकडून आपणाला हार काय घालवून घेतले ! साराच उबग आणणारा प्रकार. राजनारायण यांच्या या चाळ्यांमुळे मायावरील अत्याचार मागे पडला आणि राजरायण यांच्या-

वरील प्रकाशझोत कायम राहिला. "आमच्या मायभगिनींवर होणाऱ्या अत्याचारांचे, त्यांच्या अब्रूवर पडणाऱ्या घाल्यांचे असे राजकीय भांडवल करण्याचा तुम्हांला काही अधिकार नाही. कृपा करा आणि आपल्यावरील अत्याचारांचा प्रश्न आमचा आम्हांलाच सोडवू द्या " असे महिलांनी, त्यांच्या संघटनांनी राजनारायण यांच्यासारख्या विदुषकी 'लीडर्स'ना सांगितले पाहिजे. हे सांगण्याचा महिलांना पुरेपूर अधिकार आहे. तो अधिकार पंतप्रधानपदावर आरूढ झालेल्या इंदिरा गांधींना स्त्री असूनही नाही. कारण अशा प्रकरणाचे राजकीय भांडवल करण्याची सवय त्यांनीच इतरांना लावली आहे.

• •

मराठी ग्रंथ संग्रहालय ठाणे
निबंध

# बलात्कारी नातीगोतीही विसरतो

**बलात्कार** हा शतकानुशतके साऱ्या समाजाच्या चिंतेचा विषय आहे. बागपत प्रकरणी सत्याग्रह करण्यासाठी लोकांना आवाहन करताना लोक-दलाचे सरचिटणीस मधू लिमये यांनी म्हटले होते, "ही महाभारतकालीन युद्धाची भूमी आहे. कौरवांनी द्रौपदीला विवस्त्र करण्याचा प्रयत्न केला आणि युद्ध उभे राहिले. आजही पुन्हा पोलिसांनी या भूमीतील एका नारीची विटंबना केली आहे. महाभारताची पुनरावृत्ती झाल्याविना राहणार नाही." मधू लिमयांनी महाभारताचा दाखला अतिशय समर्पकपणे दिला यात संशयच नाही. स्त्रियांवर बलात्कार होण्याच्या, त्यांची मानखंडना होण्याच्या घटना अगदी महाभारत काळापासून चालू आहेत, माणसाचे जसजसे अवमूल्यन होत जात आहे, तसतसे बलात्काराचे प्रकारही वाढत आहेत. माणूस किती खालच्या पायरीवर जाऊन पोचला आहे याचे दर्शन घडविणाऱ्या काही बातम्या जरी नुसत्या वाचल्या तरी आपली आपणासच माणूस म्हणवून घ्यायची लाज वाटते. आई, बहीण, मुलगी ही सारी नातीच जणू वासनेपायी आपण विसरलो आहोत.

★ नासिकहून आलेली ही बातमी पहा : पंधरा वर्षांची एक मुलगी घाबऱ्या घाबऱ्या शेजारच्या घरात घुसते. प्रारंभी काही मिनिटे तिला बोलताच येत नाही. नंतर ती जे सांगते ते रक्त गोठवून टाकणारे असते. दारू पिऊन झिंगलेल्या तिच्या बापाने तिच्यावर बलात्कार करण्याचा प्रयत्न केलेला असतो. शेजारी तिला घेऊन रीतसर पोलिस स्टेशनावर जातात, बापाला अटक होते.

★ बापाने प्रत्यक्ष आपल्या सख्ख्या मुलीवरच वाईट नजर ठेवण्याची ही काही एकमेव घटना नव्हे. पुण्याला दारूचा बेकायदा व्यवसाय करणाऱ्या एका नराधमाने आपल्या अवघ्या बारा वर्षे वयाच्या मुलीवरच भर दिवसा झडप घातली. भेदरलेल्या मुलीने वरच्या मजल्यावरून खाली उडी मारली आणि पाय मोडून घेतला.

★ जिच्याशी आपला विवाह व्हायचा त्या आपल्या प्रेयसीलाच आपल्या

हाताने गुंडांच्या वासनेला बळी देणारा प्रियकरही आपणास सापडतो. लखनौहून प्रसिद्ध झालेली बातमी माणसाच्या प्रवृत्तीवर प्रकाश टाकण्यास पुरेशी आहे. आपल्या आईवडिलांना सोडून प्रियकराबरोबर निघालेल्या त्या अश्राप कलिकेला कल्पनाही नसेल, की आपल्या हातानेच आपला भावी नवरा आपणाला चुरगळून टाकण्यासाठी मित्रांच्या टोळक्याच्या हवाली करणार आहे. पावसाचे दिवस असल्याने पाऊस पडत होता. कुठे तरी निवारा घेण्यासाठी थांबण्याच्या मिषाने त्या 'प्रियकरा'ने आपल्या प्रेयसीला एका निर्जन घराजवळ आणले आणि आत नेताना तिला आपला उद्देश सांगितला. ती शहारली आणि मागे वळली, तोच त्या प्रियकराने तिला खेचून फरफटत आत नेऊन, आधीच तिथे थांबलेल्या टोळक्याच्या पुढ्यात आदळले. काही वेळाने कपडे फाटलेली, रक्ताळलेली ती बाहेर आली, तेव्हा तिची ती उरलेली नव्हती. पोलिसांत जाऊन तिने तक्रार केली. आईबापांचे घर तर आधीच सोडले होते, पण ज्याच्यावर भरवसा ठेवून ती बाहेर पडली त्या तिच्या प्रियकरानेच तिचे सर्वस्व नागवले होते.

★ ठाण्याजवळ घडलेली ही घटना वाचून कोणाचेही मन सुन्न झाल्याविना राहणार नाही. पन्नाशीच्या घरात पोचलेल्या आपल्या आईशीच अतिप्रसंग करण्याचा एका 'कुलदीपका'ने प्रयत्न केला. हे पाहून धाकट्या भावाचा संताप अनावर झाला आणि त्याने डोक्यात पाटा घालून आपल्या मोठ्या भावाला ठार मारले.

★ इंदूरच्या नजिक असलेल्या हरसोली या गावातील एका आदिवासी वस्तीच्या दुर्दैवाची कथा एकुलती एक नव्हे. हरसोलीची पुनरावृत्ती वेळोवेळी अनेक ठिकाणी घडलेली आहेच. गावकऱ्यांचे कोणा आदिवासीशी भांडण झाले. प्रकरण विकोपास गेले आणि गावातील २५–३० दांडगे त्या आदिवासी वस्तीवर चाल करून आले. मनसोक्त मारझोड केल्यावर त्यांनी वस्तीतील पुरुषांना आपापल्या झोपड्यांत बांधून ठेवले व त्यांच्या डोळ्यांदेखत, त्यांच्या झोपड्यांतच त्यांच्या बायकांवर अनेकदा बलात्कार केला.

या अशा वार्ता रोज वर्तमानपत्रात प्रसिद्ध होणाऱ्या. या ठिकाणी नुसत्या एकत्रितपणे संकलित करायच्या म्हटले तरी 'बलात्काराचे महाभारत' या नावाने एखादा बृहद्ग्रंथ तयार करता येईल, इतके या बातम्यांचे

प्रमाण विपुल आहे. या वार्ता अनेकांनी त्या त्या वेळी वाचल्या आहेत. प्रत्येकाच्या मगदुराप्रमाणे त्या त्या वेळी लोकांच्या प्रतिक्रियाही व्यक्त झाल्या आहेत आणि तरीही या बातम्यांना खळ पडलेला नाही, कारण मुळात बलात्काराच्या घटनांना खळ पडलेला नाही. आणि तो पडेल तरी कसा ?

यासाठी या प्रश्नाचा अगदी मुळापासून आणि गांभीर्याने विचार करण्याची आवश्यकता आहे. पण आधी म्हटल्याप्रमाणे कोणाला तरी या प्रश्नाचा असा विचार करण्याची गरज वाटते आहे का ? कारण प्रत्येकजण बलात्काराचे राजकारण करण्याच्याच संधीसाठी टपून बसलेला. इंदिरा गांधीं-पासून तो राजनारायणांच्यापर्यंत ! आणि महिलांच्या मुक्तीसाठी जन्मास आल्याचा दावा करणाऱ्या आमच्या स्त्री–सखी संघटनांची स्थिती तरी या साऱ्या संधिसाधू राजकारण्यांपेक्षा वेगळी थोडीच आहे ? त्यासाठी समाजा-तील स्त्रियांची स्थिती, त्यांची दुर्बलता, समाजाचे दारिद्र्य आणि त्या दारिद्र्याचा फायदा घेण्याची धनमत्तांची वासनासक्ती, थोड्याशाही सत्तेने चढणारा उन्माद आणि त्या उन्मादात सत्ताहीन दुबळ्यांचे सर्वस्व ओर-बाडण्याची हाव, बदललेली किंवा लोपलेली नीतिमूल्ये, बीभत्स नाटके आणि निर्लज्ज सिनेमा यांनी समाजाची चाळवलेली वैषयिक आणि कामुक वृत्ती आदी अनेक गोष्टींचा साकल्याने विचार करूनच बलात्काराच्या समस्यांचा विचार करावा लागेल.

अलिगढनजिकच्या सलीमपूर येथील लछमीच्या दुर्दैवाची कहाणी या संदर्भात समजून घेण्यासारखी आहे. दीडएक वर्षापूर्वी ज्या मथुराप्रकरणी सर्वोच्च न्यायालयाने दिलेल्या निवाड्याने काहूर माजवले त्या मथुरेची कथाही अनेक बाबींवर प्रकाश टाकणारी आहे. वयाच्या अवघ्या तेविसाव्या वर्षी लछमीचे सारे जीवनच नासून टाकले गेले. बाराव्या वर्षी तिचे लग्न झाले. आपल्या दारुड्या नवऱ्याजवळ ती लग्नानंतर जवळजवळ सहा वर्षे राहिली. त्याने केलेला अनन्वित छळ तिने सोसला. रागाच्या भरात नवऱ्याने तिचा एक डोळा फोडला आणि तिच्या डोक्यावरचे केस उपटून काढले. दुसऱ्या एका प्रसंगी नवऱ्याने लछमीचा हातच मोडला. नऊ महिन्यांची गरोदर असताना नवऱ्याने तिला खोलीच्या बाहेर काढली. रस्त्याने जाणाऱ्या कोणीतरी ही एकटी बाई पाहिली आणि तिच्यावर झडप घातली, पण

लछमीने धाडसाने त्या दुष्टाचा प्रतिकार केला. नवऱ्याने तरीही तिला घराबाहेर टाकली. तिने एका घरी काम धरले. आणि या तरण्याताठ्या पोरीवर घरधन्याची नजर पडली. तिथेही तिने बहादुरी दाखवली आणि स्वतःची सुटका करून घेतली. लछमी घराबाहेर पडली तेव्हा गरोदर होती. ती बाहेरच्या या धावपळीतच बाळंत झाली. आपल्या छोट्या मुलीला घेऊन घरोघरची कामे करीत लछमी जीव मुठीत धरून दिवस कंठते आहे. तिच्या भविष्यात अंधार आहे. आणि भविष्यातील अंधारात चाचपडणाऱ्या अशा अनेक लछमी आहेत. लछमीने दाखविलेले धाडस मात्र त्या दाखवू शकत नाहीत आणि जीवाच्या भयाने त्या वासनेच्या बळी ठरतात आणि मग आयुष्यभर ते अपमानित जिणे जगत रहातात.

विदर्भातील एका खेडेगावातील मथुरा अशीच सत्तेने उन्मत्त झालेल्या दोघा पोलिसांच्या वासनेची बळी ठरली. मथुरा ज्या ठिकाणी कामास होती, तिथून तिच्या मालकानेच तिला पळवून नेली अशी फिर्याद मथुरेच्या भावाने पोलिस ठाण्यावर गुदरली. पोलिसांनी मथुरेस व तिला पळवून नेऊन लपवून ठेवणाऱ्या मालकाला पकडून चौकीवर आणले. त्या वेळी रात्री नऊ वाजले होते. जाबजवान्या झाल्यावर पोलिसांनी खऱ्या अपराध्यांना रात्री साडेदहाच्या सुमारास घरी जाण्यास परवानगी दिली. पण हेडकॉन्स्टेबल तुकाराम आणि गणपत या दोघांनी मथुरेस मात्र डांबून ठेवले. नागपूरच्या कोर्टात ज्यांच्यासमोर मथुरेचा खटला चालला त्या न्यायमूर्ती कोतवालांच्याच शब्दांत २६ मार्च १९७२ च्या त्या रात्री त्या पोलिस ठाण्यावर काय घडले ते वाचले म्हणजे अंगावर शहारे येतात. न्या. कोतवाल आपल्या निवाड्यात लिहितात: "ठाण्यावरील सगळी मंडळी निघून गेल्याची खात्री होताच गणपत शिपायाने मथुरेला हाताला धरून आत खेचली व तिथल्या शौचकूपात नेली. तिथे तिच्या अंगावरील सारे कपडे त्याने बळजबरीने काढले. भीतीने थरथरत असलेल्या मथुरेच्या उघड्या अंगाकडे विजेरीच्या अंधुक उजेडात गणपतने एकवार नजर फिरवली आणि तिथेच बाहेर असलेल्या छपरीत तिला आणली. छपरीत येताच तिला जमिनीवर पाडून, तिच्या विरोधाला दाद न देता मथुरेवर बलात्कार केला. गणपतने आपली वासना शमविल्यावर तिथेच अधीरतेने वाट पाहणाऱ्या हेडकॉन्स्टेबल तुकारामाने आपली भूक भागवून

घेण्याचा प्रयत्न केला. पण तुकाराम दारूने एवढा झिंगलेला होता की त्याला स्वतःला धड उभेही राहता येत नव्हते." या प्रकारात खालच्या सेशन्स कोर्टाने गणपत आणि तुकाराम यांना दोषमुक्त केले. कारण काय ? तर म्हणे स्त्री-पुरुषांचा शरीरसंबंध (Sexual intercourse) आणि बलत्कार (Rape) या दोनही बाबींमध्ये जमीन अस्मानाचा फरक आहे. मथुरेच्या संमतीनेच गणपतने तिच्याशी संभोग केला हा युक्तिवाद सेशन्स न्यायाधीशांनी मान्य केला. नागपूरच्या वरिष्ठ न्यायालयाने (मुंबई उच्च न्यायालयाचे खंडपीठ) मात्र सत्र न्यायालयाचा निकाल अग्राह्य ठरवून गणपत आणि तुकाराम यांना अनुक्रमे पाच आणि एक वर्षाची सक्तमजुरी दिली. ज्या परिस्थितीत हा संतापजनक प्रकार घडला, त्या परिस्थितीत मथुरा पोलिसशिपायाच्या वासनापूर्तीच्या इच्छेस खुषीने संमती देईल हे कसे शक्य आहे ? असा प्रश्न न्यायमूर्तींनी स्वतःलाच विचारला व पोलिसशिपायांना दोषी ठरवले. पण नागपूरच्या न्यायमूर्तींना पडलेला हा प्रश्न सर्वोच्च न्यायालयातील न्यायमूर्तींना पडला नाही. " मथुरा घाबरली होती, तिला मृत्यूचे भय वाटत होते वा तिने विरोध-प्रतिकार केल्यामुळे पोलिसाच्या किंवा तिच्या अंगावर जखमा झाल्या याबद्दलचा कोणताही पुरावा पुढे न आल्याने मथुरेची झाल्या प्रकारास संमती होती असे गृहीत धरले पाहिजे " असा कायद्याचा अर्थ सर्वोच्च न्यायालयाच्या न्यायमूर्तींनी लावला आणि गणपत-तुकारामांना पुन्हा निर्दोष सोडून दिले. सर्वोच्च न्यायालयाच्या या निवाड्यावर खूपच काहूर उठले आणि या निवाड्याचा फेरविचार करण्याची व मथुरा प्रकरणाचे पुनरावलोकन करण्याची मागणी मोठ्या प्रमाणावर झाली. बलात्काराच्या अपराधांचा साकल्याने विचार केला जाण्याची (अर्थात् कायद्याच्या संदर्भात) शक्यता मथुरा प्रकरणाने निर्माण झाली आहे. त्या संदर्भाचा अन्यत्र काहीशा तपशीलाने विचार करू.

• •

९०।२।९
निबंध

# मायभगिनींना टाकू नका

१९८० साल हे ‘ बलात्कार–वर्ष ’ म्हणून नोंदले जाईल, असे न्या. जी. डी. खोसला यांनी एका लेखामध्ये म्हटले आहे. याचा अर्थ एवढाच आहे, की वर्तमानपत्रांनी बलात्कार प्रकरणांची वृत्ते देण्याबाबत या वर्षी अधिक जागरुकता दाखवली. आजवरचा अनुभव लक्षात घेता किंवा त्या अनुभवाच्या तुलनेने, अशा प्रकरणांना तुलनात्मक दृष्टचा मिळालेली अधिक प्रसिद्धी पाहता सर्वसामान्य नागरिकही नेहमीपेक्षा वेगळ्या तऱ्हेने या प्रश्नाचा विचार करू लागला आहे, असे दिसते. वृत्तपत्रांच्या ठिकाणी या स्वरूपाची जाणीव निर्माण करण्याचे श्रेय नारायणपूर, बागपत वा अन्य अशाच काही घटनांना व या प्रश्नावर निदर्शनांचे रान उठवणाऱ्या काही महिला संघटनांना द्यावे लागेल. पण प्रत्यक्षात घडणाऱ्या बलात्कारांच्या घटना व वृत्तपत्रांत प्रसिद्ध होणाऱ्या घटना यांचा तौलनिक विचार केला तर प्रसिद्ध न होणाऱ्या घटनांचे प्रमाण हिमनगाप्रमाणे असते असे म्हणावयास हरकत नाही. बव्हंशी घटना अंधारातच राहतात. ‘ बलात्कार ’ या शब्दामागोमाग येणाऱ्या जनलज्जेपायी पोलिसात रीतसर तक्रार करण्याचाच संकोच वाटतो. अशा दुर्दैवी स्त्रीकडे पाहण्याचा समाजाचा दोषैक दृष्टिकोनही या प्रकारांना प्रसिद्धी न मिळण्यास किंवा पोलिस स्टेशनात त्यांची दखल घेतली न जाण्यास कारणीभूत असतो. पोलिसांचा कामचुकारपणा आणि तक्रार नोंदवून घेण्यास आलेल्यांनाच ‘ दे माय धरणी ठाय ’ करून सोडण्याची पोलिसांची मर्दुमकी यांमुळेही अनेक घटना अंधारातच राहतात. परिणाम एकच होतो, की बलात्कारित महिला तोंड दाबून बुक्क्याचा मार सहन करीत अवमानित आयुष्य घालवीत राहाते, जनलज्जेला भिऊन मरणाला मिठी मारते किंवा तेवढेही धैर्य नसेल तर पोटाची खळगी भरण्यासाठी आपल्या पायाने कुंटणखान्यात जाते. काही वर्षांपूर्वी एका सामाजिक संस्थेमार्फत वेश्यांच्या दुरवस्थेची पाहणी करण्याच्या कामात सहभागी होण्याची संधी प्रस्तुत लेखकास मिळाली होती. जिवंतपणी साक्षात् नरकवासाचे जिणे जगणाऱ्या या दुर्दैवी महिलांच्या कथा ऐकून अंगावर शहारे येतात. अनेकींच्या अनेक

कथा. समाजाच्या नादानपणाचे, ढोंगीपणाचे एवढे ढळढळीत प्रत्यंतर वेश्या-वस्तीशिवाय कुठे पहायला मिळणार ? त्या पाहणीत एका महिलेने कळवळून सांगितलेली हकीकत ऐकून मन बधिर झाले. आजही त्या भगिनीचे शब्द स्पष्टपणे आठवतात. वाराणशीची ही कॉलेजचे काही शिक्षण घेतलेली स्त्री. कॉलेजातील एका प्राध्यापकाच्या वासनेला बळी पडली; आपला निरपराधी-पणा घरच्या मंडळींना समजून सांगण्याचा तिने परोपरीने प्रयत्न केला. झाल्या प्रकरणाचा बोभाटा होऊन तिचे ठरलेले लग्न मोडले. आपल्या भावी पतीलाही तिने नाना प्रकारे विनवून पाहिले. पण या बलात्कारित मुलीचा निरपराधीपणा मानण्यास व तिला पत्करण्यास तो तरुण काही तयार नव्हता. घरचा आसरा नाही, समाजात तोंड दाखवायला जागा नाही, पावलोपावली लोकांच्या कुचेष्टा या सगळ्यांमुळे तिने जीव देण्याचा निर्णय केला. ती सांगते, "कोणत्याही क्षणी मी जीव दिला असता, अशी माझी अवस्था झाली होती. पण विचार करता करता 'मी जीव का द्यायचा ?' असा प्रश्न माझ्या मनात उभा राहिला आणि हा प्रश्न क्षणाक्षणाला मोठा होत गेला. निराशेच्या जागी संतापाची भावना उत्पन्न झाली. सूडाच्या भावनेने मी पेटून उठले. ज्या घराने मला वाळीत टाकल्यासारखे केले होते त्या घराच्या बदनामीची फिकीर करण्याचे मला काय कारण होते ?" सूडाच्या त्याच बेभान अवस्थेत तिने वाराणशीच्या कुंटणखान्याची वाट धरली आणि ती मुंबईला आली. सूडाची भावना शमल्यावर आणि त्या नरकपुरीतील यातनांचा अनुभव घेतल्यावर तिला कदाचित पश्चात्ताप झाला असेल किंवा नसेलही. कारण तिने डोळे उघडे ठेवूनच हा रस्ता पत्करला होता. पण अशा रीतीने कुंटणखान्याची वाट चोखाळावी लागलेल्या दुर्दैवी महिलांची संख्या थोडीथोडकी नव्हे. या बाईनं समाजावर 'सूड' उगविण्याच्या भावनेतून कुंटणखान्याचा रस्ता उघड्या डोळ्यांनी चोखाळला. पण त्याला समाजा-कडून होणारी उपेक्षाच कारणीभूत म्हणावी लागेल. या उपेक्षेपायी आणि पोलिसांकरवी होणाऱ्या मानहानीपायी 'तोंड दाबून बुक्क्यांचा मार' सहन करणेच अनेकजणी पसंत करतात. मध्यंतरी एका समाजसेवकाने बलात्का-रास बळी पडलेल्या काही स्त्रियांच्या आणि बलात्काराच्या आरोपाखाली शिक्षा भोगणाऱ्या काही अपराध्यांच्या मुलाखती घेतल्या. एका वीस वर्षे

वयाच्या मुलीस हा समाजसेवक सुधारगृहात भेटला. त्या मुलीने अर्थातच पोलिसात तक्रार नोंदवलेली नव्हती. बाप आजारी पडला म्हणून ती त्याच्याऐवजी शेतावर कामावर जाऊ लागली, तिथे मालकाने तिच्यावर अत्याचार केला. बाहेर इतर कामगार अगतिकपणे बसून होते. ती घरी आली. पण तिच्यावर गुदरलेला प्रसंग बापाला कळताच त्याने तिला घराबाहेर घालवून दिली आणि मग तिला गाव सोडून शहराचा रस्ता धरावा लागला. तिला सुदैवाने सुधारगृहात राहण्याची संधी मिळाली. तिथे येण्यापूर्वीच ती समाजकंटकांच्या तावडीत सापडली असती तर कुंटणखान्यातील बंदिनींच्या संख्येत आणखी एकीची भर पडली असती. वर्तमानपत्रात प्रसिद्धी न मिळालेल्या बलात्काराच्या अनेक घटनांची चालतीबोलती माहिती महिलांच्या या जिवंत मढ्यांकडून आपणाला मिळते. अलीकडेच बागपत प्रकरणी राज्यसभेत झालेल्या चर्चेच्या वेळी एका महिला खासदाराने म्हटले होते, "अध्यक्ष महोदय, देशातील सारे कुंटणखाने धुंडाळा, अनेक माया त्यागी तिथे तुम्हांला आढळतील." खासदाराबाईंच्या या उद्‌गारांनी मला काही वर्षांपूर्वीची, त्या अभागी महिलेची कथा आठवली. कोणत्याही पोलिस स्टेशनातील रेकॉर्डमध्ये या कथेची नोंद सापडणार नाही; जशी बांद्रे हायवेला घडलेल्या एका भीषण नाट्याची नोंदही पोलिस ठाण्यामध्ये आढळली नाही ! साऱ्या देशभर काही दिवस एकच गदारोळ उडवून देणाऱ्या त्या घटनेतील त्या स्त्रीची हकीकतही आपणाला अंतर्मुख करणारी आहे. आपल्या बायकोला गुंडांच्या हाती सोडून नवरा आपल्या पायांनी चालत घरी येतो. गुंडांच्या पाशवी वासनेला बळी पडलेली ती दुर्दैवी स्त्री दुसऱ्या दिवशी सकाळी घरी येते आणि स्वतःला जाळून घेते. का ? का म्हणून स्वतःचा काहीही अपराध नसताना ती स्वतःला शिक्षा करून घेते ? कारण एकच की ज्याच्याबरोबर आपल्याला आयुष्य काढायचे तो आपला नवराही आपल्याला मनःपूर्वक स्वीकारणार नाही ही शंका नव्हे खात्री तिला वाटत असली पाहिजे. त्या लाजिरवाण्या जिण्यापेक्षा जीव दिलेला बरा या भावनेनं तिनं स्वतःला जाळून घेतलं. याही घटनेची कुठे नोंद नाही. त्यामुळे पोलिस म्हणतात 'घटना घडलीच नाही.' पोलिसांचे म्हणणेही खरे असेल. पण लोकांचा पोलिसांवर विश्वास एवढा की घटना घडली असल्याबद्दल लोकांची बालंबाल

खात्री ! खाजगीमध्ये अनेकजण घटनेच्या सत्यतेबद्दल निर्वाळा देतात, पण पुढे होऊन पोलिसांत माहिती देण्यास मात्र कोणी तयार नाही, आणि त्यामुळेच "अगा जे झालेचि नाही" म्हणून कानावर करण्यास पोलिस मोकळे. या प्रकरणी सदर वार्ताहरास पोलिसांकडून झालेला त्रास हा एका स्वतंत्र चर्चेचा विषय आहे. त्याचा ऊहापोह येथे करण्याचे कारण नाही. प्रस्तुत प्रश्नाशी संबंधित विषय एवढाच, की बलात्काराच्या अनेक घटनांची नोंद जनलज्जेस्तव, लोकभयास्तव पोलिसात होतच नाही; पोलिसात ज्या मोजक्या घटना नोंदल्या जातात त्यांना वर्तमानपत्रात प्रसिद्धी मिळत नाही. आणि त्यामुळेच गेल्या वर्षभरात या अत्याचारांना एकाएकी प्रसिद्धी मिळाली यामागेही सत्ताधाऱ्यांना बदनाम करण्याचा हेतू होता की काय अशी शंका काही महाभागांनी व्यक्त केली. समजा, तसा हेतू असला, तरी अत्याचारांची वास्तवता तर त्यायोगे कमी होत नाही ना? वांद्रे हायवेवरील हे भीषण नाटच खरे असो वा नसो, अशा घटना पोलिसात वेळीच न नोंदविणे समाजाच्या दृष्टीने केवढे अहितकारक असते, याची जाणीव या घटनेने झाली असली तरी खूप झाले.

बलात्काराचा गुन्हा हा एकच असा गुन्हा आहे की, ज्यायोगे अपराध्यापेक्षाही अपराधास बळी पडलेली स्त्री समाजाच्या दृष्टीने अधिक त्याज्य ठरते. नैतिकतेच्या चुकीच्या कल्पना बलात्काराशी जोडल्या गेल्यामुळे बलात्काराकडे पाहण्याचा समाजाचा दृष्टिकोन दोषैक बनलेला आहे. अन्य गुन्ह्यांप्रमाणेच स्त्रियांवर होणारा एक अत्याचार एवढ्याच दृष्टीने बलात्कारांकडे पाहण्याची शुद्ध दृष्टी समाजाने स्वीकारली पाहिजे आणि समाजाचा स्त्रीकडे पाहण्याचा दृष्टिकोनही बदलला पाहिजे. ' Rape is human ' असे एक मुख्यमंत्री या विसाव्या शतकातही बिनदिक्कत सांगू शकतो ! ' निदान असेंब्ली चालू असेपर्यंत तरी बलात्कार करू नका ' असे निर्लज्ज गुप्त परिपत्रक राज्याचा पोलिस महानिरीक्षक राज्यातील साऱ्या पोलिस ठाण्याला पाठवू शकतो ! पूर्वीच्या काळी शत्रुपक्षाच्या स्त्रियांवर बलात्कार हे विजय साजरा करण्याचे प्रतीक मानले जात असे. शत्रुपक्षाच्या स्त्रियांवर केलेले बलात्कार समाजाला त्याज्य वाटत नसत. आज तशी अवस्था नाही हे खरे, पण कोळसाखाणीत संप करणाऱ्या कामगारांना

नमविण्यासाठी किंवा त्यांना दहशत बसविण्यासाठी गुंडांकरवी कामगारांच्या बायका–बहिणींवर बलात्कार करविणारे रानटी, असंस्कृत मालक आजही आपणास दिसतातच ना? बलात्कारित महिलेवर झालेल्या शारीरिक अत्याचारांचा आणि त्याहीपेक्षा तिच्या दारुण मनोभंगाचा, चुराडा झालेल्या तिच्या भावनांचा विचार करायची समाजाला आजही गरज वाटत नाही. त्या दुर्दैवी, अभागी स्त्रीच्या वेदनांपेक्षाही, तिच्यावर झालेल्या बलात्कारामुळे तिच्या कुटुंबाची मानहानी होते याचीच साऱ्यांना फिकीर आणि म्हणून बलात्काराचा अपराध या कानाचा त्या कानाला कळू न देण्याची खबरदारी. बलात्काराकडे पाहण्याच्या या सदोष दृष्टीमुळेच खरे गुन्हेगार सुरक्षित राहतात. मुळात बलात्काराच्या संबंधातील कायदा सदोष, त्यात समाजाची हे गुन्हे झाकण्यासाठी धडपड, त्यामुळे कायद्याचे हात गुन्हेगारांपर्यंत पोचूच शकत नाहीत. 'मेरी स्टोप्स सोसायटी' या नावाची एक संस्था स्त्रीसमस्यांचा अभ्यास करते. तिचे सचिव पीटर लेटन यांच्या म्हणण्यानुसार भारतात सालिना निदान दोन लाख स्त्रियांवर बलात्कार होतात. लेटन यांनी दिलेला हा आकडा अंदाजाने दिलेला आहे. पण या दोन लाख बलात्कार अपराधांपैकी पोलिसांत नोंद किती अपराधांची होते? अधिकृत आकडेवारीचा हवाला देऊन बोलायचे झाल्यास १९७२ मध्ये बलात्काराचे २५६२ गुन्हे नोंदविले गेले, तर १९७३ मध्ये २८६१, १९७४ मध्ये २८६२ आणि १९७५ मध्ये ३२८३ गुन्ह्यांची पोलिस दप्तरात नोंद झाली.

या ठिकाणी दिलेल्या तक्त्यावरून प्रत्यक्षात घडणारे बलात्काराचे गुन्हे आणि पोलिसांत नोंदले जाणारे गुन्हे यांच्यातील भयानक तफावत दिसून येईल. यामुळेच पोलिस हात झटकून टाकायला मोकळे होतात. वांद्रे हायवे प्रकरणी काय घडले त्याचा अनुभव ताजाच आहे. दिल्लीचे पोलिस उपायुक्त डॉ. के. के. पॉल यांची भूमिका लक्षात घेण्यासारखी आहे. वर्तमानपत्रांना दिलेल्या मुलाखतीत डॉ. पॉल म्हणतात, "पोलिस गुन्हेगारांकडे दुर्लक्ष करतात, अशी तक्रार लोक करतात. नाही तरी लोकांची पोलिसांकडून खूपच अपेक्षा असते. पुरावा न मिळू शकणाऱ्या, आमच्याकडे न नोंदविलेल्या अपराधाबद्दलही आम्ही संशयितांना शासन करावे, असे लोकांना वाटते." या पॉल महोदयांनी केलेली एक तक्रार मात्र नमुनेदार म्हणता

येईल. "पोलिसांचे जाऊ द्या, पण न्यायालये तरी कुठे सहानुभूतीने विचार करतात ? शिवाय कमकुवत कायद्याने न्यायालयांचे हात बांधलेलेच असतात की नाही ?" आपल्यावरील जबाबदारी झटकून टाकण्याचा हा पोलिसी खाक्या काही औरच म्हणावा लागेल. पॉल यांच्या या विधानाचे खंडन त्याच वृत्तपत्रात स्त्री संघर्ष संघटनेच्या जेसिका महादेवन या पदाधिकारी स्त्रीने केले आहे. महादेवन् बाई म्हणतात : "There is definite and active connivance on the part of the police in rape cases, and both rape and dowry-deaths are part of the same phenomenon : oppression of women. Rape is not a crime of one individual against one woman, but crime against womanhood. You don't even have to look around to find cases of rape these days."

जेसिका महादेवन यांनी वर्णन केलेल्या परिस्थितीचे प्रत्यंतर आपणालाही जागोजाग येते. बलात्काराचे गुन्हे पोलिसांत नोंदण्याची लोकांना लाज वाटते, घराण्याची अब्रू जाण्याचे भय वाटते, हे खरे; पण असे गुन्हे अधिक प्रमाणात नोंदले न जाण्याचे आणखी एक कारण म्हणजे गुन्हे नोंदवून घेण्याबाबत पोलिसांकडून होणारी टाळाटाळ किंवा चालढकल. बलात्काराच्याच नव्हे, साऱ्याच गुन्ह्यांच्या बाबतीत गुन्हे नोंदवून न घेण्यातील पोलिसांची तत्परता हा सार्वत्रिक अनुभवाचा विषय आहे. दिल्लीनजिक अलिपूर ब्लॉकमधील तेजपूर या गावच्या दुर्दैवी मातापित्यांनी कथन केलेला अनुभव हा पोलिसाबाबतचा प्रातिनिधिक स्वरूपाचा अनुभव आहे. २४ एप्रिल १९८० या दिवशी शेतावरून काम करून घरी परतल्यावर त्यांची आठ वर्षांची मुलगी कमलेश हिचे टांगलेले प्रेत त्यांच्या घरात त्यांना आढळून आले. वासनेने जनावर बनविलेल्या कोणी तरी आठ वर्षांच्या कोवळ्या कमलेशवर बलात्कार करून तिचा गळा घोटला होता. कमलेशचे आईवडील पोलिसांत तक्रार नोंदविण्यास गेले तेव्हा पोलिसांनी तक्रार नोंदवून घेण्यासच नकार दिला आणि त्या कमनशिबी आईवडिलांना पिटाळून लावले. गाजलेल्या मथुरा प्रकरणाचा अन्यत्र उल्लेख केलेलाच आहे. त्यात तर पोलिसांचे केवळ औदासिन्यच दिसून आलेले नाही तर तक्रार देण्यासाठी चौकीवर आलेल्या अश्राप मथुरेवर पोलिसांनीच बलात्कार

केल्याचा संतापजनक अनुभवही मथुरा प्रकरणातून आलेला आहे. कायद्यातील कमकुवतपणामुळेही बलात्काराच्या प्रकरणातील आरोपी नेहमीच सुटतात, याचेही ढळढळीत प्रत्यंतर मथुरा प्रकरणाने आणून दिले आहे.

पोलिसांच्या नाकर्तेपणावर प्रकाश टाकणारी आणखी एक संतापजनक घटना उत्तर प्रदेशातील बांदा जिल्ह्यांतील कोलगादिया (ता. कारवी कसबा) येथे २३ जून १९८० च्या मध्यरात्री घडली. या गावात एका सशस्त्र टोळीने धुमाकूळ घातला आणि सात स्त्रियांवर बलात्कार केले. राजकिशोरी या मुलीवर तर लागोपाठ चौघांनी अत्याचार केला. काही स्थानिक वृत्तपत्रांनी या घटनेस प्रसिद्धी दिल्यावर नेहमीप्रमाणे पोलिसांनी कानावर हात ठेवले. आमच्याकडे काही खबरच नाही असे पोलिसांनी सांगितले असले तरी वस्तुस्थिती मात्र अशी होती : नजीकच्याच कारवी येथील पोलिस ठाण्यावर तक्रार नोंदवण्यास गावकरी गेले तेव्हा पोलिसांनी त्यांचा एक शब्दही ऐकून घेण्यास नकार दिला. एवढेच नव्हे, " गावातील स्त्रियांवर असा काही अत्याचार झाला आणि हत्यारबंद गुंडांनी मारहाण केली याबद्दल कुठे वाच्यता कराल तर खबरदार " असा दमही पोलिसांनी गावकऱ्यांना दिला. खासदार श्रीमती रामनिहोर राकेश यांनी कोलगादियाला भेट दिली, तेव्हा गावकऱ्यांनी त्यांच्यापुढे हा सर्व पाढा वाचला. या भेटीच्या वेळी 'संडे' या इंग्रजी साप्ताहिकाचा वार्ताहरही बरोबर गेला होता. तो या प्रकरणाची हकीकत सांगताना लिहितो, " त्या दुर्दैवी मुलीचा आक्रोश आम्हांला ऐकवत नव्हता. त्यांपैकी एकीने सांगितले : पोलिस हमे मजबूर करती है कि हम सबसे कहे कि कुछ नही हुआ. पोलिस की प्रतिदिनकी पूछताछसे हम बहुत डर गये हैं और डरके मारे हम रोज शाम को–दिन छिपने से पहले–अपना घर छोडकर पास के शहर कारवी या सिद्धपूर गाँव में भाग जाते हैं। हमारा सब कुछ लूट गया है. बहन–बेटी की इज्जत लूट गयी है. और पोलिस भी डरती हैं ।

रात्र पडण्यापूर्वी दुसऱ्या गावी बायकांनी राहायला जाऊन त्यांच्या सुरक्षिततेची हमी मिळणार आहे का ? कारण ज्यांनी ही हमी द्यायची वह पुलिस भी डरती है.

● ●

# बलात्कार कायद्यातील काथ्याकूट

**कायद्यापुढे** सर्वजण समान असल्याचे नेहमी सांगितले जाते. न्यायदेवता आंधळी असते, असेही म्हटले जाते. समोर आलेल्या पुराव्याची छाननी करून न्यायालये न्यायनिवाडा करतात. अनेकदा पुरेसा पुरावा मिळत नाही. अनेकदा कायद्यातील पळवाटांनी खरा अपराधी हा निरपराधी ठरतो. बलात्कार प्रकरणांत तर हा विषादजनक अनुभव नेहमीच येतो. कारण, मुळात बलात्कार झाला की नाही, बलात्कारित महिलेचीच या शरीर-संबंधाला संमती नसेल कशावरून, संशयित आरोपीनेच बलात्कार केला हे खरे कशावरून, शरीरसर्वस्व लुटले गेल्याने आधीच मेल्याहून मेल्यासारखे झालेली स्त्री वैद्यकीय तपासणीसाठी तरी हजर राहील की नाही असे एक ना दोन अनेक प्रश्न बलात्कराचा आरोप सिद्ध होण्याच्या संदर्भात उपस्थित होतात. बलात्कारास बळी पडलेल्या स्त्रीकडे पाहण्याचा समाजाचा दृष्टि-कोनच मुळात दोषैक स्वरूपाचा आहे. जिच्यावर अत्याचार होतो, ती स्त्रीच वाईट चालीची असली पाहिजे असे धरून चालण्याची प्रवृत्ती अनेक प्रकरणी दिसून येते. स्टेटस्मन पत्राच्या ५ जुलै १९८० च्या अंकात आलेल्या एका बातमीत म्हटले आहे, " रायपूर भागात गेल्या काही दिवसांत बला-त्काराचे २० हून अधिक गुन्हे घडले. पण या बहुतेक स्त्रिया वाईट चालीच्या होत्या असे पोलिसांचे म्हणणे आहे. " मथुरा प्रकरण जेव्हा वर्तमानपत्रातून गाजत होते, तेव्हा त्यावर उलटसुलट प्रतिक्रया प्रसिद्ध होत होत्या. दिल्लीच्या एका तरुण व्यापाऱ्याची प्रतिक्रिया मध्यप्रदेशातील पोलिसांच्या उपयुक्त समर्थनाशी मिळतीजुळतीच आहे. हा व्यापारी म्हणतो, " केवढे आकांडतांडव चालवलंय् या लोकांनी ? मथुरेचं शील पोलिसांनी लुटलं म्हणे. ते शील त्यापूर्वीच ती गमावून बसली होती. पोलिसांच्या हाती सापडण्यापूर्वीच तिचं कुंवारपण भंगलेलं होतं " या दोन्ही प्रतिक्रियांवर अधिक भाष्य करण्याची आवश्यकता नाही. समाजाच्या या प्रकारच्या भावनेमुळेच बलात्काराच्या गुन्ह्यांची पोलिसांकडे नोंद करण्याची टाळाटाळ केली जात असेल. एखादी स्त्री वाईट चालीची आहे, हे गृहीत धरले तरीसुद्धा त्यामुळे तिच्यावर

अत्याचार करण्याचा परवाना समाजकंटकांना कसा काय मिळतो ? आणि वा.इट चालीच्या स्त्रीवरील बलात्कार समर्थनीय तरी कसा ठरतो ?

वर उल्लेख केलेल्या दोनही प्रातिनिधक प्रतिक्रिया व्यक्त करणारे पुरुष तरी होते. पण स्त्रियासुद्धा असाच निष्कर्ष काढताना पाहून मात्र आश्चर्य वाटते. इतर सामान्य स्त्रियांचे राहू द्या, पण देशाच्या पंतप्रधानपदी असलेल्या इंदिरा गांधींनी–एका महिलेनेच–बलात्कार प्रकरणाचा विचार निर्भेळपणे करू नये याला काय म्हणावे ? बागपत कांडातील माया त्यागी जेव्हा पंत-प्रधानांना भेटण्यासाठी गेली तेव्हा त्यांनी मायाची कथा ऐकून घेतली खरी; पण त्यानंतर त्या म्हणाल्या, " इस विषयमें और भी कुछ बातें सुनाई देती है..." पंतप्रधानांना अपेक्षित असलेली ही 'कुछ बातें' कोणती होती ? पंतप्रधानांनी ज्यांचा उल्लेख केला त्या गोष्टी म्हणजे मायाचा नवरा ईश्वर त्यागी हा त्या भागातील एक प्रमुख दरोडेखोर होता. तो आणि त्याच्या टोळीतील लोक गाडीतून चालले होते. आणि मायाचाही या टोळीशी संबंध होता. पोलिसांनी आपल्या अपराधावर पांघरूण घालण्यासाठी प्रसृत केलेल्या या कथेला पंतप्रधानांनीही बळी पडावे आणि " और भी कुछ बातें सुनाई देती है–" असे म्हणून मायावर झालेल्या अत्त्याचारांची तीव्रता कमी कर-ण्याचा पंतप्रधानांनी प्रयत्न करावा हा केवळ दैवदुर्विलासच म्हणावा लागेल. 'डाकूच्या टोळीत सामील असलेल्या स्त्रीवर झालेला बलात्कार तितकासा चिंतेचा विषय मानायचे कारण नाही' हा पंतप्रधानांच्या वरील उद्गारा-तून निघणारा ध्वन्वर्थ अधिक चिंतेचा वाटतो. बागपत प्रकरणामुळे आपल्या विरोधकांना आयतेच कोलीत सापडल्यामुळे पंतप्रधान चिडलेल्या असणे स्वाभाविक असले तरी त्यांनी एका बलात्कारित महिलेला असे उडवून लावण्याची गरज नव्हती. बलात्काराच्या गुन्ह्याचा विचार करताना 'गुन्हा झाला की नाही' एवढाच विचार केला जायला हवा. त्या स्त्रीच्या पूर्व-चारित्र्याचा वा तिच्या सग्यासोयऱ्यांच्या चारित्र्याचा विचार केला जाण्याची आवश्यकता असता कामा नये.

मथुरा प्रकरणाचा अभ्यास केला तर या संदर्भात आणखी प्रकाश पडू शकेल. बचाव पक्षाने म्हणजे पोलिसांच्या वकिलांनी मथुरा ही वाईट चालीची होती हे सिद्ध करण्याचा प्रयत्न केला. गणपत आणि तुकाराम या दोघा

पोलिसांनी तिला बळजबरीने ओढून नेले या वस्तुस्थितीलाच मुळी आरोपीच्या वकिलांनी आव्हान दिले. "Women like being raped. No woman can be raped against her will." हा युक्तिवाद बलात्काराच्या खटल्यात नेहमी केला जातो. सर्वोच्च न्यायालयात बचावपक्षानेही असाच युक्तिवाद केला. पोलिसांनी खुणावताच ती त्याच्याबरोबर आतल्या बाजूस गेली, असे सांगून बचावाचा वकील विचारतो, "मथुरेची संमती नसती तर झटापट झाल्याच्या काही खाणाखुणा मथुरेच्या अंगावर दिसल्या असत्या की नाही ? स्त्रीच्या इच्छेविरुद्ध तिच्यावर कोणी बलात्कार करूच शकत नाही. Rape always leave marks-bruises, bleeding, torn clothes–इथे मथुरेच्या बाबतीत तर यांपैकी कशाचाच मागमूस दिसत नाही. मग तिच्यावर अत्याचार झाला हे कसे म्हणावे ?" बचावाचा हा युक्तिवाद करण्यात वकील काही चूक करीत होता असे नव्हे. कारण 'बलात्कारा'ची व्याख्या करताना कायद्यातच या सर्व गोष्टी गृहीत धरल्या गेल्या आहेत. त्याला तो वकील तरी काय करणार ? मथुरा प्रकरणाचाच विचार केला तरी असे दिसेल, की भर पोलिस ठाण्यात दोघा दांडग्या पोलिसांना विरोध करण्याचे धाडसच मथुरेला झाले नसेल; गुंडांच्या सुऱ्याला घाबरून आपली बायको त्यांच्या ताब्यात देणाऱ्या नेभळ्या नवऱ्याची आणि मथुरेची अवस्था एकाच प्रकारची नव्हे का ? मुंबई वरिष्ठ न्यायालयाच्या नागपूर खंडपीठापुढे जेव्हा मथुरा–प्रकरणातील अपिलाची सुनावणी झाली तेव्हा न्या. कोतवाल यांनी मार्मिकपणे कायद्यातील या पळवाटेवर बोट ठेवले. त्याचा उल्लेख या विवेचनात अन्यत्र आलेलाच आहे.

कायदा कमकुवत आहे, असे जेव्हा म्हटले जाते, तेव्हा त्यातील या उणिवा लक्षात घेऊन त्या बदलण्याचा प्रयत्न झाला पाहिजे. मथुरा प्रकरणी सर्वोच्च न्यायालयाने घेतलेल्या भूमिकेविरुद्ध एकच काहूर उठले आणि हा सदोष कायदा बदलण्याची सार्वत्रिक मागणी होऊ लागली. एवढेच नव्हे तर, सर्वोच्च न्यायालयाने दिलेला निकाल मथुरेवर आणि पर्यायाने समस्त स्त्रीजातीवर अन्याय करणारा असल्याने या प्रकरणाची फेरसुनावणी व्हावी म्हणून महिलांच्या अनेक संघटनांनी निदर्शने, निषेधमोर्चे यांची एकच धमाल उडवून दिली. महाराष्ट्र सरकारनेही फेरसुनावणीचा आग्रह धरला. फेर सुना-

वणी का आवश्यक आहे, याबाबतची आपली भूमिका मांडताना महाराष्ट्राच्या वकिलांनी सर्वोच्च न्यायालयात मोठा समर्पक युक्तिवाद केला. त्याचा थोडक्यात सारांश असा : "भयाकुल परिस्थितीत दहशतीखाली बलात्कार होतो, त्यावेळी स्त्री शरणागती पत्करते. ही शरणागती म्हणजे आपल्यावर होणाऱ्या अत्याचारांना स्त्रीची संमतीच होय असे मानणे अन्यायकारक ठरेल. या प्रकरणातील दुर्दैवी मथुरा अवघी पंधरा वर्षांची आहे. प्रत्यक्ष पोलिस ठाण्यावर असल्याने ती भीतीने थरथरते आहे, तिने शारीरिक प्रतिकाराचा कितीही प्रयत्न केला तरी अपुराच पडणार. खरे म्हणजे अशा प्रकरणी स्त्रीने प्रतिकार केला की नाही हे सिद्ध करण्याची गरजच असता कामा नये. ती मुलगी वाईट चालीची होती हे गृहीत धरले तरी मथुरेला ज्या परिस्थितीत पोलिसांच्या वासनेचा बळी व्हावे लागले, त्या परिस्थितीत तिची संमती होती वा आपल्यावर झालेल्या अत्याचारांनी तिला वैषयिक समाधान लाभले हे म्हणणे न पटणारे आहे."... या पार्श्वभूमीवर मथुरेच्या खटल्याची फेर सुनावणी करण्याचा सर्वोच्च न्यायालयाने निर्णय केला.

पण फेर सुनावणी झाली तरी मुळात कायदाच सदोष असेल तर? तर कायद्यात दुरुस्त्या करण्याचाही विचार झाला पाहिजे. गेल्या काही दिवसांत व्यक्त झालेले लोकमत लक्षात घेऊन केंद्र सरकारने १९८० च्या अंदाजपत्रकी अधिवेशनात फौजदारी कायद्यात काही दुरुस्त्या सुचविणारे विधेयक मांडले. हा मजकूर लिहीत असेपर्यंत या विधेयकावरील लोकसभेचा कौल लागलेला नव्हता. विधि आयोगाने केलेल्या शिफारशींनुसारच या दुरुस्त्या होत आहेत. बलात्काराचा कायदा मुळात निरपराध, दुर्दैवी महिलांचे संरक्षण करण्यास पुरेसा नव्हता, ह्या वस्तुस्थितीची जाणीव मथुरा आणि अन्य प्रकरणांतून झाली. याचे मुख्य कारण वर म्हटल्याप्रमाणे 'बलात्कारा'ची चुकीची व्याख्या कायद्यात गृहीत धरली गेली हे होय. बलात्कार या शब्दातच मुळी बळाचा वापर गृहीत धरलेला आहे. चेंबर्स ट्वेंटिएथ सेंचुरी या शब्दकोशात Rape या शब्दाचा अर्थ "Carnal knowledge of a woman without her consent" असा दिला आहे, तर ऑक्सफर्ड इंग्लिश शब्दकोशात "act of carrying away a person by force, specially a woman" किंवा "violation or ravishing of a woman" असा दिलेला आहे.

या दोनही व्याख्येमध्ये स्त्रीची रीतसर संमती नसताना तिचा शारीरिक उपभोग घेणे अभिप्रेत आहे. या व्याख्येनुसार नवऱ्याने आपल्या पत्नीशी तिची इच्छा नसताना, किंबहुना तिच्या इच्छेविरुद्ध केलेला शरीरसंग हाही बलात्कारच मानला जाणे आवश्यक आहे. कायद्यात तशी स्पष्ट तरतूद असावी अशी काही स्त्री-संघटनांची मागणी आहे. कारण बलात्काराचा अत्त्याचार हा एका मानसिक विकृतीचा परिणाम आहे. आणि सामूहिक बलात्काराचे प्रकार हा सामाजिक विकृतीचा परिपाक आहे. बलात्कार माणूस करतो तेव्हा त्याला माणूस म्हणायचे का हा खरा प्रश्न आहे. कारण सभ्य मानवी वर्तनाच्या सर्व मर्यादा त्याने ओलांडलेल्या असतात. एवढेच नव्हे तर, मानवी प्रतिष्ठेचाही उपमर्द बलात्काराच्या अपराधामुळे केला जातो. सामूहिक बलात्काराच्या घटनांचा अभ्यास केला तर अशा बहुतेक घटना काही विशिष्ट सूडाच्या भावनेतून घडलेल्या दिसून येतील. एखादा जमीनदार शेतमजुराच्या बायकोवर, एखादा उच्चवर्णीय पुरुष हरिजनाच्या स्त्रीवर बलात्कार करतो, तेव्हा तो जाती-जमातीचा विचार करीत नाही. आपली विषयवासना पुरविण्याचे एक साधन म्हणूनच तो अशा स्त्रीकडे पाहातो. सत्तेचा उन्मादही त्यामागे असतो. पण सामाजिक बलात्कार याआधी म्हटल्याप्रमाणे सामाजिक विकृतीतून उद्‌भवतात. उदाहरणार्थ एका सत्यघटनेचा उल्लेख करता येईल. एका गावातील हरिजन तरुणाचा गावातील एखाद्या वरच्या जातीतील मुलीशी संबंध आला. त्यामुळे गावातील उच्च वर्णीयांचे पुढारी भडकले व त्यांनी हरिजन वस्तीवर चाल करून तेथील हरिजन स्त्रियांवर सूड म्हणून अत्याचार केले. नारायणपूर, अम्बाचंदन येथील बलात्काराच्या घटना याच प्रकारात मोडतात. असे सामूहिक बलात्कार समाजप्रबोधन आणि सामाजिक सुधारणा झाल्यावर बंद होऊ शकतील. पण वैयक्तिक बलात्काराचे—माणसाच्या मानवी विकृतीतून उद्‌भवणारे बलात्कार थांबविण्यासाठी मात्र कठोर कायद्याची भीती निर्माण केली गेली पाहिजे. कायद्यातील पळवाटांचा आधार घेऊन हुषार वकील आपली सुटका करू शकेल असा बलात्कारी गुन्हेगारास वाटणारा विश्वास पार ढासळून टाकणे हाच एक महत्त्वाचा उपाय ठरू शकेल. त्यामुळे कायद्यात केवळ कठोर शिक्षेची तरतूद असणे पुरेसे नाही. कायदा आपल्या बाजूचा नाही, ही खात्री

बलात्कार करणाऱ्या अपराध्यास वाटली पाहिजे. कायद्याचे भय निर्माण होणे महत्त्वाचे आहे.

जगदाळपूर येथे काही महिन्यांपूर्वी बलात्कार केल्याच्या किंवा करण्याचा प्रयत्न केल्याच्या आरोपावरून पोलिसांनी अकरा जणांना पकडले व त्यांची डोकी भादरून गावातून धिंड काढली. पण अशा धिंडी काढून बलात्काराच्या अपराधांना पायबंद बसणार नाही. कारण हा मुळातच माणसाच्या सुसंस्कृतपणाशी निगडीत असा प्रश्न आहे. अपराध्याची सार्वजनिक बदनामी केल्याने तेवढ्यापुरती त्याला उपरती होईल किंवा ज्यांनी प्रत्यक्ष ती धिंड पाहिली त्यांच्या मनात थोडीशी धास्ती निर्माण होईल. पण ही तत्कालिक व स्थानिक स्वरूपाची प्रतिक्रिया असेल. ठाण्यावर आलेल्या मुलीची अब्रू लुटण्यापेक्षा जगदाळपूरच्या पोलिसांनी अपराध्याचे मुंडन करण्यामध्ये दाखविलेली कल्पकता कौतुकास्पद असली तरी तो पुरेसा उपाय नव्हे, त्याचा उपयोग मर्यादितच होईल. दिल्लीत 'महिला दक्षता समिती'च्या वतीने आयोजित केलेल्या "Social offence against women" या विषयावरील परिसंवादात बोलताना सर्वोच्च न्यायालयाचे एक न्यायमूर्ती श्री तुळजापूरकर यांनी बलात्काराच्या गुन्ह्यात जे दोषी ठरतील त्यांना भर चौकात चाबकाने फोडून त्यांची चामडी लोळवावीत अशी शिक्षा फर्मावली. बलात्काराच्या अपराधाविषयी आपणास वाटणारी कमालीची चीड आणि संताप व्यक्त करण्यास तुळजापूरकरांनी सुचविलेला उपाय पुरेसा ठरू शकेल. पण तो परिणामकारक उपाय मात्र नव्हे. कारण अशी शिक्षा करण्यापूर्वी गुन्हा शाबित झाला पाहिजे. या ठिकाणी उल्लेख केलेल्या दोन्ही उपायांचा सामाजिक जागृती करण्यासाठी अल्पसा उपयोग होऊ शकेल. समाज-प्रबोधन ही एक दीर्घकालीन प्रक्रिया आहे. बलात्काराविषयी प्रामुख्याने बलात्कारित स्त्रीविषयी–असलेले गैरसमज दूर करून त्या स्त्रीचा समाजात पूर्ववत् प्रतिष्ठेने स्वीकार केला जाणे, गुन्हेगारांना सुटका करून घेता येणार नाही असा कायद्याचा योग्य बंदोबस्त करणे आणि या कायद्याविषयी अपराध्याच्या मनात भय निर्माण होणे इतक्या बाबींचा एकत्रित परिणाम घडवून आणण्याच्या दृष्टीने सरकार आणि विचारवंत यांना प्रयत्न करावे लागतील.

● ●

# वकिलांचा हास्यास्पद युक्तिवाद

**बलात्काराच्या** विद्यमान कायद्याखाली आरोप सिद्ध होऊन आरोपीस शिक्षा होणे किती अवघड आहे, याची साक्ष हरयाणातील एका उदाहरणावरून पडू शकेल. १९७७-७८ या संपूर्ण वर्षातील बलात्कारांच्या अपराधांपैकी केवळ एकाच प्रकरणी आरोपीविरुद्धचा अपराध सिद्ध होऊ शकला. या प्रकरणात अपराधास बळी पडलेली गंगा ही ७० वर्षांची म्हातारी होती. गंगा आपल्या घराच्या व्हरांड्यात एकटीच बसलेली असताना रस्त्याने जाणाऱ्या एका इसमाचे तिच्याकडे लक्ष गेले. तो तडक तिच्या घरात शिरला आणि त्याने त्या म्हातारीवर बलात्कार केला. तिचा नातू घरात एकटाच होता. त्याचा ओरडा ऐकताच त्या इसमाने म्हातारीचा गळा दाबून खून केला. पण तोपर्यंत शेजारची मंडळी जमून त्यांनी आरोपीस पोलिसांच्या हवाली केले. म्हातारीची मरणोत्तर तपासणी झाल्यावर तिच्यावर बलात्कार झाल्याचे सिद्ध झाले व आरोपीस खून आणि बलात्कार अशा दोन गुन्ह्यांबद्दल सक्त मजुरी झाली. म्हातारी मेल्यामुळे तिची शारीरिक तपासणी करता आली, पण बलात्कारास बळी पडूनही लोकलज्जेस्तव शारीरिक तपासणी करण्यास स्त्रिया तयार होत नाहीत व त्यामुळेही बलात्काराचा आरोप सिद्ध करणे जड जाते. बलात्करित स्त्रीला पोलिस ठाण्यावर कोणत्या दिव्यातून जावे लागते, याची कल्पना अशाच एका अभागी तरुणीच्या मुलाखतीवरून येऊ शकेल. 'संडे स्टँडर्ड' च्या (१७ ऑगस्ट १९७९) अंकात प्रसिद्ध झालेल्या मुलाखतीत ही अनामिका म्हणते : मी तक्रार घेऊन पोलिस ठाण्यावर गेले. माझे सर्व कपडे काढण्यात आले आणि माझ्या सर्वांगाची तपासणी करण्यात आली. तिथे हजर असलेल्या फौजदारांपैकी एकाची नजर माझ्या अंगावरून भिरभिरताना मला जाणवत होती.

"तपासणी कोणी केली ?"

"डॉक्टरांनी."

"तपासणी केली म्हणजे काय केले ?"

"माझे हात, पाय, छाती, पोट, कमरेखालचा भाग तपासण्यात आले."

पण आरोपीवरील बलात्काराचा आरोप सिद्ध व्हायचा तर या दिव्यातून बाईला जावेच लागते, या तपासणीशिवाय पोलिसही हतबल ठरतात हेही आपण लक्षात घेतले पाहिजे. विद्यमान फौजदारी कायद्यातील बलात्कारविषयक तरतूदीमुळे हे आवश्यकच आहे. पोलिसांना दोष देण्यापूर्वी प्रामाणिक पोलिसांचीही काही बाजू आहे, ती आपण माहीत करून घेतली पाहिजे. या संबंधात एका पोलिस इन्स्पेक्टराची कैफियत त्याच्याच शब्दात ऐकण्यासारखी आहे. तो म्हणतो, "अशी तपासणी करणे लज्जास्पद वाटते हे खरेच आहे. पण आम्हांलाही नाइलाजानेच हे करावे लागते. कोणीही येऊन बलात्कार झाल्याची कोणाविरुद्ध तक्रार करावी आणि आम्ही त्यावर भरवसा ठेवून न्यायालयात खटला भरावा हे कायद्याच्या दृष्टीने योग्य नव्हे. आरोपीचा गुन्हा सिद्ध होण्याइतपत पुरेसा पुरावा आम्हांला जमा करावाच लागतो. त्याचाच एक भाग म्हणून ही तपासणी ! बलात्कारित बाईच्या अंगावरील आरोपीच्या ओरखडयाच्या खुणा, त्याच्या कपडयाच्या खाणाखुणा इत्यादींमुळे आरोपीचा गुन्ह्याशी दर्शनी संबंध प्रस्थापित करणे सोपे जाते."

बलात्कार–कायद्यात कोणत्या सुधारणा व्हायला पाहिजेत आणि विधी आयोग व फौजदारी कायदा दुरुस्ती विधेयक यांनी कोणत्या सुधारणा दाखविल्या आहेत ते पाहण्यापूर्वी एतद्विषयक विद्यमान कायदा काय आहे, तो आपण थोडक्यात पाहू या. भारतीय दंड सहितेच्या ३७५ व ३७६ या कलमामध्ये बलात्काराची व्याख्या दिलेली आहे. बलात्कार (Rape) या शब्दाचा इंग्रजी शब्द कोशातील अर्थ आपण अन्यत्र पाहिला आहे. तो डोळ्यासमोर ठेवूनच दंड संहितेत बलात्काराची कायदेशीर व्याख्या करण्यात आलेली आहे. (१) स्त्रीच्या इच्छेविरुद्ध (२) तिच्या संमतीविना (३) दहशत वा मृत्यूचे भय दाखवून तिची संमती घेऊन (४) स्त्रीला फसवून, कायदेशीर लग्न झाले नसतानाही, तसे झाल्याचे भासवून आणि (५) सोळा वर्षांखालील मुलीशी तिच्या संमतीने वा संमतीविना बळजबरीने केलेला संभोग म्हणजे बलात्कार अशी ही व्याख्या आहे. स्त्रीशी आरोपीचा शारीरिक संबंध (Sexual intercourse) आलेला आहे हे दाखविण्यासाठी वैद्यकीय तपासणीद्वारे उपलब्ध होणारा पुरावा आवश्यक ठरतो. या व्याख्येतून आरोपी

सुटण्यासाठी बचावाच्या वकिलाची सारी धडपड संबंधित तरुणी सोळा वर्षाच्यावरील (म्हणजे कायदेशीर सज्ञान) आहे, व ती स्खलनशील, ' चालू ' बाई आहे हे दाखविण्याची असते. बलात्काराचा कोणताही खटला घेतला तरी "न्यायधीश महाशय, हो बाई चालू आहे, हे आपल्या लक्षात आले असेलच" असे अनेक वेळा न्यायालयात ठासून सांगितले जाते. स्त्रियांची वेषभूषा, त्यांचे समाजातील वर्तन उत्तेजक असते, त्यामुळे आरोपीचा स्वतः-वरचा ताबा सुटतो व त्याच्या हातून बेभान अवस्थेत अपकृत्य घडते असाही बचाव करून गुन्ह्याचे गांभीर्य कमी करण्याचा प्रयत्न केला जातो. एका वकिलाने एका प्रकरणी न्यायालयात बचावाचे युक्तिवादात्मक भाषण करताना सांगितले, "बायकांनी जर भडक आणि उत्तान कपडे वापरले नाहीत, आणि त्या धोक्याच्या ठिकाणी रात्री बेरात्री एकटचा दुकटचा गेल्या नाहीत, तर असे प्रसंगच निर्माण होणार नाहीत !" न्यायमूर्तींनी त्याचा हा बचाव ग्राह्य मानला असला तरी सर्वसाधारणपणे स्त्रियांच्या उत्तान वेषभूषेवर आणि त्यांच्या सार्वजनिक ठिकाणच्या वर्तनावर (काहीजण या वागण्यास छचोर म्हणतात) बलात्काराच्या गुन्ह्यांचे खापर फोडतात. वास्तविक स्त्रियांची प्रक्षोभक वेषभूषा बलात्कारास कारणीभूत होते, हे म्हणणेही पूर्णांशाने सत्य नव्हे. आणि त्यामध्ये अल्पांश तथ्य आहे. असे वादाकरिता गृहीत धरले तरी त्यामुळे आरोपातील जघन्यता कमी कशी काय होते ? स्त्रियांचे कपडे उत्तेजक असावेत की नाही, सार्वजनिक ठिकाणी त्यांचे वर्तन गैरसमजास कारणीभूत होण्याइतपत मर्यादाभंग करणारे असावे की नाही हा एका वेगळ्या चर्चेचा विषय होऊ शकतो. पण त्याचा बलात्काराच्या गुन्ह्याशी समर्थन म्हणून संबंध लावणे मात्र अनिष्ट आणि अनुचितच म्हणावे लागेल. तीच गत "बाईचीच तशी इच्छा होती" या युक्तिवादाची. आग्रा येथे ८ वर्षाच्या मुलीवर ५० वर्षांच्या एका इसमानं बलात्कार केला, तो काय त्या मुलीची इच्छा होती म्हणून ? मुलीच्या बापाशी भांडण झाले, त्याचा सूड म्हणून एका गृहस्थाने १४ वर्षे वयाच्या मुलीवर बलात्कार केला, येथेही त्या मुलीची इच्छा होती असे म्हणणार काय ? आणि बलात्कारास बळी पड-णाऱ्या वृद्ध स्त्रियांबद्दल काय म्हणणार ? "संमती नव्हती" हे सिद्ध करण्याची जबाबदारी फिर्यादी पक्षावर म्हणजे बलात्कार प्रकरणांतील

कमनशिबी स्त्रीवर सोपवून कायदा हात झटकून मोकळा झाला आहे. आरोपी वरिष्ठ अधिकारी, पोलीस, धनदांडगा असेल तर त्याच्याविरुद्ध पुरावा उभा करणे जड जाते. बलात्कार करूनही आरोपी उजळ माथ्याने बाहेर येतो आणि चारित्र्यहीनतेची तप्तमुद्रा कपाळावर मिरवीत बाईला उभा जन्म अवहेलनेत कंठावा लागतो किंवा मरण जवळ करावे लागते !

बलत्काराच्या खटल्याचा चिकित्सक अभ्यास केला तर असे दिसेल की कायद्यातील अनेक तरतुदी स्पष्ट नाहीत, गुंतागुंतीच्या स्वरूपामुळे गोंधळ उडवून देणाऱ्या आहेत. मथुरा प्रकरणी फेरसुनावणीची मागणी करताना संमती आणि शरणागती असा भेद केला जावा अशी अनेकांनी मागणी केली अनेकदा सामाजिक आणि आर्थिक दुर्बलतेमुळे दबलेली स्त्री आपला विरोध प्रकटही करू शकत नाही. मग प्रतिकार करणे तर दूरच; पद्मिनीने अन्य राजपूत रमणींसह जोहार केला. सर्वोच्च न्यायालयाचे न्यायमूर्ती श्री. कृष्णा अय्यर यांनीही एका परिसंवादात बोलताना " losing life is better than losing dignity " असा सार्थ सल्ला महिलांना दिला. स्त्रीवर होणारा बलात्कार हा तिच्या आत्मसन्मानावर होणारा सर्वात मोठा आणि असह्य असा आघात असल्याने आणि बलात्कारानंतर जिवंतपणीही मढ्यासारखे आयुष्य कंठावे लागत असल्याने मरणास कवटाळावे हा कृष्णा अय्यर यांचा उपदेश आदर्श म्हणून ठीक आहे. सर्वच बलात्कारित स्त्रियांची या दिव्यास तयारी नसली तरी काही मनस्वी स्त्रिया आपल्या हातानेच आपले आयुष्य संपवतातही. 'वांद्रा हायवेवरील बलात्कार' म्हणून गाजलेल्या घटनेतील स्त्रीने हा आदर्श घालून दिला. पोलिसांनी कोणत्याही नोंदीच्या अभावी ही घटना केवळ कपोलकल्पित आहे असे भासवून कानावर हात ठेवले, तरी जनतेचा त्यावर विश्वास मात्र बसला नाही. (कारण पोलिसांनी गमावलेली विश्वासार्हता !) पण ही घटना व तिचा पोलीसकृत इन्कार प्रसिद्ध होताच काही दिवसांनी मुंबईतील लालबाग विभागातील मंगला मोरे या तरुणीने बलात्काराची मानहानी सहन न होऊन स्वतःला जाळून घेतल्याची कथा प्रसिद्ध झाली. भर दुपारी बारा वाजता, गजबजलेल्या चाळीतील खोलीत ती एकटी असताना शेजाऱ्याने आत घुसून तिच्यावर बलात्कार केल्याचे तिने मृत्यूपूर्व जबानीत सांगितले. आता याही प्रकरणी 'मंगलाची संमती होती'

असे सांगण्याचा प्रयत्न बचाव पक्षाकडून होणारच नाही असे नाही आणि कायद्यातील विद्यमान उणीवेमुळे संमती सिद्ध करण्याची जबाबदारी बचाव पक्षावर नसल्याने आरोपी सुटूही शकेल ! मुंबई वरिष्ठ न्यायालयात फिर्यादी पक्षाच्या बाजूने उभे राहिलेल्या एका वकील महोदयांनी सांगितलेली घटना या संदर्भात उद्‌बोधक आहे. नव्यानेच लग्न झालेले फूटपाथवर राहणारे एक जोडपे. रात्रीच्या वेळी नवरा काही कामासाठी उठून बाजूला गेल्याचे जवळच दबा धरून बसलेल्या एका पोलिसाने पाहिले, आणि त्या अंधाराचा फायदा घेऊन पोलिसाने संधी साधली. अंधार एवढा होता की त्या बाईला आपल्या शेजारी झोपलेला पुरुष हा आपला नवरा नाही हे समजलेच नाही. अचानकपणे नवरा परत आला आणि त्याच्या लक्षात झाला प्रकार आला. पोलिसावर खटला भरला गेला, पण बाईच्या सांगण्यावर कोणाचाच नव्हे, तर कोर्टाचाही विश्वास बसला नाही. पोलीस नामानिराळा झाला. बाई कोर्टाकडून ' चालू ' ठरविली गेली.

कायद्याच्या अंमलबजावणीत अनेक दोष या उदाहरणातून स्पष्ट होतील. त्यातून सामाजिक स्थितीवरही प्रकाश पडतो. स्त्री ही मुळातच दुर्बल असली तरी दुर्बल वर्गातील स्त्री अधिक दुबळी असते हे या उदाहरणावरून दिसून येईल. न्यायालयात स्त्री किती अगतिक होते, हे या प्रकरणातून लक्षात येते. खरे म्हणजे स्त्री कितीही बदचालीची असली तरी उघडपणे आपल्यावर बलात्कार झाला असे सांगण्याचे धाडस तिला होत नाही. ही स्त्री न्यायालयाच्या आणि समाजाच्याही विश्वासाला पारखी होते. न्यायालयांकडून अपेक्षित सहानुभूतीही बलात्कारित स्त्रियांना मिळू शकत नाही. हे अनुभव समाजातील खालच्या वर्गातील स्त्रियांना अधिक येतात असेही काही नामवंत वकिलांचे म्हणणे आहे. आणि याचे मुख्य कारण म्हणजे गुन्हा सिद्ध करण्याची सारी जबाबदारी कायद्यानुसार वादी पक्षावर म्हणजेच प्रस्तुत विषयात बलात्कारित स्त्रीवर येऊन पडते आणि बलात्काराचा अपराध सिद्ध करणे हे नेहमीच अवघड जाते. कारण स्त्री एकटी असतानाच प्रायः बलात्काराचा गुन्हा घडतो, त्यामुळे स्त्री आपल्यावतीने फारच क्वचित प्रसंगी साक्षीदार उभा करू शकते. आरोपी आणि स्त्री यांचा योगायोगाने पूर्व परिचय असेल तर स्त्रीची बाजू आणखीनच कमकुवत होते. एका खटल्यात या पूर्व परि

चयाचा आधार घेऊनच बचावाच्या वकिलाने युक्तिवाद करताना सांगितले, की " if she consented before she may consent again. " आणि यात मुळीच आश्चर्य नाही, की न्यायमूर्तींनीही हा युक्तिवाद ग्राह्य धरला आणि बलात्कारित महिलेस अनैतिक संबंधाला चटावलेली सराईत बाई (habituated to ilicit sexual intercourse) ठरविले. आणखी एका वकील महोदयांच्या मते "बलात्काराच्या बहुतेक घटना या घरातून पळून गेलेल्या मुलीच्या बाबतीत किंवा विवाहबाह्य संबंधांना चटावलेल्या स्त्रियांच्या बाबतीत घडलेल्या असतात." पण अलीकडे घडलेल्या बहुतेक सर्व घटना बारकाईने पाहिल्या तर वकील महाशयांचा युक्तिवाद खोटा असल्याचे आढळून येईल. नवी दिल्लीतील "ब्यूरो ऑफ पोलिस रिसर्च अँड डेव्हलपमेंट" या संस्थेने केलेल्या पाहणीनुसार बेपत्ता झाल्याची नोंद करण्यात आलेल्या मुलींपैकीं ५४ टक्के मुली या बलात्कारासाठी पळविण्यात आलेल्या असतात. ८ टक्के मुली वेश्याव्यवसायासाठी पळविण्यात आलेल्या असतात आणि २९ टक्के मुली स्वखुशीने पळून गेलेल्या असतात. पण त्यांच्यापैकीही काही जणी-वर बलात्कारास बळी पडण्याची पाळी येते.

बलात्कारविषयक कायद्यातील काही प्रमुख उणीवांचा आपण येथे ऊहापोह केला. भारताचे सरन्यायाधीश य. वि. चंद्रचूड यांनाही या उणीवांची जाणीव झाली आणि त्यांनी दिल्लीतील एका परिसंवादात त्या दृष्टीने काही उपाय सुचविले. त्यांचा सर्व संबंधितांनी विचार करणे आवश्यक आहे. पोलिस ठाण्यांवर जाऊन तक्रार नोंदण्याची बायकांना लाज, संकोच (व भीतीही) वाटते हे लक्षात घेऊन स्थानिक पातळीवर महिलांच्या सरकारमान्य दक्षता समित्या नेमाव्यात आणि त्यांच्याकडेच बलात्काराच्या गुन्ह्याची प्रारंभीची नोंद व्हावी म्हणजे बलात्कारित महिला मोकळेपणाने आपले मनोगत प्रकट करील, असे न्या. चंद्रचूड यांनी सुचविले आहे. ते म्हणतात, "स्त्रीचा अधिकार हा मूलतः मानवी अधिकाराचा प्रश्न आहे, आणि त्या दृष्टीनेच त्याच्याकडे पाहिले पाहिजे. कारण बलात्काराचा गुन्हा हा अन्य अपराधाप्रमाणे शांतता आणि सुव्यवस्थेचा प्रश्न नाही. ती मानवी सभ्यतेशी, सुसंस्कृतपणाशी निगडित असलेली समस्या आहे. बलात्काराचे गुन्हे घडणे व कायद्याची अंमलबजावणी करणे या दोनही बाबी पुरुषांच्या मनोरचनेवर अवलंबून आहेत. पुरुषांची

मनोरचना बदलत नाही तोवर बलात्कारित स्त्रीला न्याय मिळणे दुरापास्त म्हणावे लागेल." न्या. चंद्रचूड यांचे हे विधान अतिव्याप्त आहे. पण तरीही सामाजिक विकृतीचा प्रभाव बलात्काराच्या अपराधांमध्ये जाणवतो, असा अर्थ चंद्रचूड यांच्या विधानातून काढता येतो. त्यासाठी स्त्रियांनाच तक्रारी नोंदवून घेण्याचे अधिकार असावेत हे तर न्या. चंद्रचूड यांनी सुचविलेच पण अन्यही काही खबरदारीची उपाययोजना त्यांनी सुचविली आहे, ती अशी :

(१) बलात्काराच्या सर्व प्रकरणी नेमण्यात येणाऱ्या ज्यूरर्स आणि असेसर्स स्त्रियाच असाव्यात, (२) बलात्कार सिद्ध झाल्यास किमान सात वर्षे सक्त मजुरीची शिक्षा देण्यात यावी, (३) न्यायालयात बलात्काराचा खटला चालू असेल तेव्हा त्याच्याशी संबंध नसलेली गर्दी तेथे जमू देऊ नये. लहान मुलगी जर बलात्कारित म्हणून न्यायालयासमोर उभी असेल तर ती या गर्दीमुळे गोंधळून जाते. (४) कायद्याचा अन्वयार्थ लावण्याचे कारण बलात्कार प्रकरणी तरी असू नये इतका कायदा स्पष्ट असावा. सरन्यायाधीशांच्या या सूचना एका अनुभवी न्यायाधीशांनी केलेल्या सूचना आहेत. त्यांची दखल सरकारने घेतली पाहिजे. काही महिला संघटनांना तर खटले चालविण्यासाठी न्यायमूर्ती म्हणून स्त्रियांची नेमणूक व्हावी असे वाटते. ही सूचना लगोलग मान्य होण्यासारखी नसली; तर महिला संघटनांवर अशी सूचना करण्याची पाळी का आली याचा सर्वांनीच विचार केला पाहिजे.

# आता महिलांनीच पुढे सरसवावे

भारतातील विद्यमान फौजदारी कायदा शंभराहून अधिक वर्षांहून जुना म्हणजे ब्रिटिश जमान्यातील आहे. ब्रिटिशांना त्यात बदल करण्याची आवश्यकता भासली नाही. पण स्वातंत्र्योत्तर काळातही त्यात काहीच बदल झाला नाही. सामाजिक परिवर्तनाचे त्यात प्रतिबिंब पडणे ही स्वाभाविक बाबही दुर्लक्षिली गेली. फौजदारी कायद्यातच बलात्काराच्या अपराधाचाही समावेश असल्याने या अपराधांची दखलही त्याच जुन्या व काहीशा निकामी झालेल्या कायद्याच्या आधारे घेतली गेली. त्यामुळे या कायद्याने बळीच्या ऐवजी अपराध्यालाच संरक्षण मिळते अशी भावना निर्माण होऊ लागली हे आपण आतापावेतो करण्यात आलेल्या विवेचनात पाहिले. गेल्या वर्षभरात बलात्काराच्या अपराधांना अधिक वाचा फुटली. या अपराधांचा वापर करावा की नाही, हा वेगळ्या वादाचा विषय आहे. पण एक गोष्ट मान्य केलीच पाहिजे की नारायणपूर आणि बागपत या प्रकरणी दोन वेगवेगळ्या राजकीय पक्षांनी स्वतःच्या राजकीय स्वार्थाकरिता का होईना, बलात्काराच्या त्या भीषण घटनांविरुद्ध आवाज उठविल्यामुळेच वर्तमानपत्रांनी दखल घेतली. त्यातही पोलिसांची बलात्कारक्षमता ही लागोपाठ काही प्रकराणत दिसून आल्यामुळे पोलिस हेही टीकेचे लक्ष्य बनले व त्यामुळेही बलात्काराच्या अपराधांची अधिकाधिक दखल घेतली जाऊ लागली. काही महिला संघटनांनी तात्कालिक संतापाच्या भरात का होईना, पण बलात्काराच्या विरुद्ध काही काळ मोहीम उघडली व या सर्वांचा साकल्याने परिणाम समाजात सार्वत्रिक जागृती होण्यात झाला. या जागृतीमुळेच न्यायालयात बलात्काराच्या खटल्याचे कामकाज कसे चालते यावरही झगझगीत प्रकाश पडला आणि त्यातूनच कायद्यात बदल करण्याची मागणी जोरात पुढे आली. विधी आयोगानेही जनतेतील या संतापाची दखल घेऊन फौजदारी कायद्यात काही बदल सुचविले व भारत सरकारनेही बलात्कराच्या अपराधास किमान सात वर्षांची सक्तमजुरीची शिक्षा देण्याची तरतूद करणारा वटहुकूम जारी केला.

बलात्काराचा कायदा हा बायकांना संरक्षण देण्यास अपुरा आहे, असे

मत विधी आयोगानेही आपल्या अहवालात व्यक्त केले आहे. बलात्काराच्या गुन्ह्यांमध्ये बळी पडलेल्या स्त्रीला गुन्हा घडल्यानंतरही भयानक दिव्यातून जावे लागते. आपल्या चौऱ्यांशाव्या अहवालात विधी आयोगाने म्हटले आहे : " गुन्हा घडून गेल्यावरही स्त्रीला प्रथम पोलिसांची खातरजमा करावी लागते सर्वांगाची वैद्यकीय तपासणी करून घ्यावी लागते आणि न्यायालयात अपमानास्पद उलट तपासणीला तोंड द्यावे लागते. कायद्याचे स्त्रीला संरक्षण मिळू शकत नाही याचे कारण बलात्काराच्या गुन्ह्यातील आपले निरपराधित्व सिद्ध करण्याची जबाबदारी कायद्याने तिच्यावर सोपवली आहे." आता विधी आयोगाने सुचविलेल्या दुरुस्तीनुसार वादी स्त्रीने तक्रार केली की त्यावर विश्वास ठेवला पाहिजे. स्त्रीच्या संमतीचा प्रश्न त्यानंतर उपस्थित करता येणार नाही आणि केलाच तर अशी संमती आणि आरोपीचे निरपराधित्व सिद्ध करण्याची जबाबदारी विधी आयोगाने आता आरोपीवर टाकली आहे. बारा वर्षांखालील मुलीवर बलात्कार झाला असेल तर तिची प्राथमिक तपासणी स्त्री पोलिसांनीच करावी असेही बंधन आयोगाने सुचविले आहे. ही वयोमर्यादा बाराचीच का असा प्रश्न विचारता येईल. पण तो फारसा मतभेदाचा मुद्दा होऊ नये. कारण ही वयोमर्यादा वाढवता येऊ शकेल. न्यायालयात उलटतपासणीच्या वेळी स्त्रीच्या सर्व पूर्वचारित्र्याचा जाहीर पंचनामा न करता केवळ अपराधी आणि संबंधित स्त्री यांच्या परस्पर संबंधांपुरतीच उलटतपासणी घेतली जावी असेही विधी आयोगाने सूचित केले आहे आणि सर्वात महत्त्वाचे म्हणजे बलात्कार-खटल्यांची सुनावणी बंदिस्त स्वरूपात (in camera) व्हावी, ती आम जनतेस खुली नसावी अशीही शिफारस विधी आयोगाने केली आहे. ब्रिटनसारख्या देशातूनही अशा खटल्यांची सुनावणी बंदिस्त स्वरूपात करण्याचे प्रमाण वाढत आहे. भारतासारख्या देशात बलात्कारास सामाजिक कलंक मानले जाते, हे लक्षात घेतले म्हणजे अशा स्वरूपाच्या ' इन कॅमेरा ' सुनावणीचे महत्त्व समजू शकेल. विधी आयोगाच्या या शिफारशींच्या आधारे १२ ऑगस्ट १९८० रोजी फौजदारी कायद्यात दुरुस्ती करणारे विधेयक मांडले गेले.

कायद्यातील दुरुस्तीचा मार्ग मोकळा झाल्याने एक महत्त्वाची मागणी मान्य झाली आहे. या संकल्पित कायद्यात बलात्कारी इसमास कायद्याने

द्यावयाची शिक्षाही वाढविण्यात आलेली आहे. सर्वोच्च न्यायालयाचे न्या. तुळजापूरकर यांनी सुचविल्याप्रमाणे बलात्कारी अपराध्यास भर चौकात फोडून काढण्याची शिक्षा जरी नव्या कायद्यात सुचविलेली नसली, तरी किमान सात वर्षांची सक्तमजुरी सुचविली आहे. आरोप सिद्ध होण्याच्या मार्गातील बऱ्याच अडचणी या संकल्पित कायद्यात दूर करण्यात आल्या असून आरोप सिद्ध करण्यास सुलभ जावे अशा तरतुदी केल्या आहेत.

पण एवढ्याने बलात्काराचा प्रश्न संपला असे होणार नाही. कारण अपराध्याला शासन होण्याइतकेच बलात्कारित महिलेचा समाजाने खुल्या मनाने स्वीकार करणे महत्त्वाचे आहे. या आधी नमुन्यादाखल दिलेली एक दोन उदाहरणे पाहिली तरी बलात्कारित स्त्रीला स्वतःचा कोणताही अपराध नसताना अवमानित जिणे कंठावे लागते. घरास आणि स्वकीयांस मुकावे लागते. समाजाच्या कोरड्या सहानुभूतीसही ती पारखी होते. बलात्कार करणारा मात्र उजळ माथ्याने वावरतो. कठोर कायदा आणि त्याची तितकीच काटेकोर आणि कठोर अंमलबजावणी करण्याबरोबर बलात्कारास बळी पडलेल्या कमनशिबी स्त्रीकडे पाहण्याचा समाजाचा दृष्टिकोन बदलण्याची आवश्यकता आहे. त्याचबरोबर अशा स्त्रियांना मदतीचा निरक्षेप हात देणारी काही केंद्रेही समाजाने निर्माण केली पाहिजेत. अनेक देशांत स्त्री संघटनांनी ' रेप क्रायसिस् सेंटर्स ' स्थापन केली आहेत. बलात्काराने जीवन उद्‌ध्वस्त झालेल्या स्त्रीला भावनात्मक मदतीचा हात देणे आणि तिला कायदेशीर साह्य मिळवून देणे ही कामे अशी केंद्रे पार पाडतात. भारतातील सामाजिक वातावरण लक्षात घेता आपल्याकडे तर अशा केंद्रांची नितांत आवश्यकता आहे. नव्हे, स्त्री मुक्तीची आरोळी ठोकणाऱ्या नारी-सखी मंडळांनी अशी केंद्रे चालविली पाहिजेत. पण आपल्याकडे ही सामाजिक कामे अनेकदा केवळ एक फॅशन म्हणूनच केली जातात. त्यातही स्त्रियांच्या ज्या संस्था आहेत त्या तर केवळ फॅशनेबल कामापुरत्याच आहेत, असे म्हटल्यास त्यात वस्तुस्थितीचा विपर्यास केला असे कोणी म्हणू शकणार नाही. बलात्कार विरोधी मंच स्थापन करून रस्तोरस्ती निदर्शने करणाऱ्या लढाऊ महिला संघटनाही या नियमास अपवाद नाहीत. बलात्काराच्या अपराधांची वर्तमानपत्रातील चर्चा बंद झाल्यावर किंवा चर्चेची तीव्रता कमी झाल्यावर या

महिलांचा लढाऊ बाणाच थंडावला हे दृश्य विषादजनक आहे. गाजावाजा न करता काही एका निष्ठेने विधायक स्वरूपाची कामे करणे ही एक तपस्याच आहे. आणि निदर्शनांपेक्षा ही तपस्या अधिक हितप्रद आहे. आमच्या महिला संघटनांना ही उपरती होईल तो सुदिन म्हटला पाहिजे. केवळ कायद्यात कठोरपणा आणून काम भागणार नाही. बलात्कारोत्तर परिस्थितीचा मुकावला करण्याचा विचार कायद्यात केला आहे. पण या अपराधाच्या मुळाशी असलेल्या कारणांचा विचार आणि बंदोबस्त कायदा किंवा सरकारही करू शकणार नाही. महिलांना ही लढाई आपली आपणच लढावी लागेल. पुरुषी वर्चस्व आणि त्याचे शक्तिश्रेष्ठत्व बलात्काराच्या मुळाशी असते. प्राणाचे भय दाखविले तरी जीवात जीव असेपर्यंत आपल्या सर्वस्वाला बलात्कारी इसमास हात लावू द्यायचा नाही असा निर्धार स्त्रियांनी केला पाहिजे. 'समाजामध्ये स्त्रीला दुय्यम स्थान आहे, म्हणुन बलात्काराचे गुन्हे होतात' हे विधान काहीसे अर्धसत्य स्वरूपाचे आहे. स्त्रिया समाजकंटकां-पुढे, सत्ताधाऱ्यांपुढे, धनवंतांपुढे शरणागती पत्करतात, साधा प्रतिकारही अनेकदा त्या भयास्तव करीत नाहीत. ही वस्तुस्थिती आपण लक्षात घेतली पाहिजे. भयापोटी पत्करलेली शरणागती म्हणजे स्त्रीची बलात्कारास संमति नव्हे, हे खरे, पण अटीतटीचा प्रतिकार झाल्याविना कोणतीही स्त्री आपणास हस्तगत करता येणार नाही, असा वचक बलात्कार करू इच्छि-णाऱ्याच्या मनात निर्माण झाला पाहिजे. त्यासाठी स्त्रीलाच उभे रहावे लागेल. महिला संघटनांनी या दृष्टीने सामान्य स्त्रीला प्रतिकारक्षम बन-विण्यासाठी प्रयत्न का करू नयेत? बलात्कार समस्येचा विचार करीत असताना या व अशाच अनेक अनुषंगिक बाबींचा विचार आपण केला पाहिजे. स्त्रियांच्या शिक्षणात शारीरिक प्रतिकारक्षमतेची वाढ करणाऱ्या अभ्यास क्रमाचा समावेश करण्याची गरज आहे. महिला संघटनांनी त्यासाठी आग्रह धरला पाहिजे. स्वतः होऊन असा अभ्यासक्रम सुरू केला पाहिजे. गुंडांचा प्रतिकार करून स्वतःची सुटका करून घेणाऱ्या महिलेचा सार्वजनिक गौरव महिला संघटनांनी का करू नये? ऑफिसमधल्या वरिष्ठाला झिडकारण्याचे धाडस दाखविणाऱ्या स्त्रीकर्मचाऱ्याचा सत्कार कोणी केल्याचे माझ्यातरी ऐकिवात नाही! बलात्करास प्रतिष्ठा प्राप्त करून देणाऱ्या, अनैतिक

संबंधांची महती गाणाऱ्या नाटक–सिनेमांचा हातभार बलात्कारास मोठ्या प्रमाणावर लागतो. हे लक्षात घेऊन अशा नाटक सिनेमांवर समाजानेच बहिष्कार घातला पाहिजे. अशा चळवळीस काही मंडळी प्रतिगामी म्हणून नाके मुरडतील, हे खरे; नारी–मुक्तीसाठी संघर्ष करणाऱ्या संघटनांनी अशा अनैतिक संबंधांचा पुरस्कार करणाऱ्या नाटक सिनेमा आदी साहित्य यांच्यावर बहिष्कार घालण्याची मोहीम हाती घेतली पाहिजे. वास्तवतेच्या नावाखाली रंगमंचावर व्यभिचार आणि बलात्कार यांची दृश्ये उघडया डोळ्यांनी पाहायची आणि थिएटर बाहेर बलात्कारीविरुद्ध मोहीम चालवायची हा दुटप्पीपणा झाला.

स्त्रियांकडून ही अपेक्षा केली जात असताना समाजानेही आपली काही कर्तव्ये पार पाडण्याची गरज दृष्टीआड करून चालणार नाही. बलात्कारी इसमाचा प्रतिकार करताना मृत्यू पत्करणाऱ्या स्त्रीचा आधुनिक पद्मिनी म्हणून आम्ही गौरव करू. स्वतःचा निरपराधीपणा सिद्ध करायचा म्हणजे स्त्रीला स्वतःच्या प्राणाची किंमत चुकवावी लागते. पण बलात्काराचा अवमान सहन करूनही जिवंत राहिलेल्या स्त्रीला जिवंतपणीच मरण सोसावे लागते. अशा स्त्रियांचा आपल्या कुटुंबात पुन्हा उजळ माथ्याने स्वीकार केला जाईल तेव्हाच बलात्काराच्या गुन्ह्यामागोमाग निर्माण होणाऱ्या अनेक सामाजिक समस्यांचे निराकरण होऊ शकेल. समाजाची प्रवृत्ती बदलण्याच्या दृष्टीने समाज प्रबोधनाची व्यापक मोहीम हाती घेतली पाहिजे. हे समाजप्रबोधन करण्याच्या कामी सामाजिक संस्थांप्रमाणेच वृत्तपत्रांनाही महत्त्वाची कामगिरी बजावता येईल. बलात्काराची वृत्ते देताना काहीतरी खळबळजनक, सनसनाटी माहिती द्यायची एवढीच धंदेवाईक वृत्ती वर्तमानपत्रांची असता कामा नये. समाज प्रबोधनाच्या दृष्टीने एक सातत्याची मोहीम वृत्तपत्रांनाही हाती घेण्याची गरज नाकारता येणार नाही. अनावृत उघडया नागडया स्त्रियांची चित्रे असणाऱ्या जाहिराती छापणार नाही, असा दंडक वृत्तपत्रांनी स्वतःवर का घालून घेऊ नये ?

आणि सर्वांत मुख्य म्हणजे कायदा करून आपली जबाबदारी संपली असे म्हणून सरकारला हात झटकून मोकळे होता येणार नाही. सरकारनेही बलात्काराच्या गुन्ह्यांविरुद्ध मोहीम उघडली पाहिजे. बलात्काराविषयी चर्चा

करण्यासही अद्याप काही मंडळींना संकोच वाटतो. ही 'आळी गुपचिळी' मोडण्याचा सरकारने प्रयत्न केला पाहिजे.

बलात्कार करणारी माणसे ही या समाजातीलच असतात. एरवी इतरांसारखीच असतात. पण ती सामाजिक विकृतीने पछाडलेली असत बलात्काराच्या अपराधासाठी शिक्षा भोगून बाहेर आलेल्या एका आरो विचारले असता त्याने सांगितले, "दारू प्याल्यामुळे मी शुद्ध गमावून बस माझे मित्र म्हणाले, चलो, जरा मजा उडायेंगे. रस्त्याने एकटी मुल होती. मी थोडासा घाबरलो. तेव्हा डरपोक म्हणून माझी मित्रांनी नि केली. मग मात्र मी पुरुषासारखा वागलो." दुसरा असाच एक आ सांगतो, "अंधाऱ्या वाटेने एक तरणीताठी मुलगी जाताना मी पाहि अशा वेळी पिक्चरमधला व्हिलन काय करतो ते मी पाह्यलं होतं. म मलाही चान्स का घेता घेणार नाही, असा विचार माझ्या मनात आ आणि दुसऱ्याच क्षणी मी त्या मुलीवर झडप घातली. कंबख्त जोरजोरा ओरडली आणि मी पकडला गेलो. मला शिक्षा झाली, पहिली नोकरी गेली. आता मात्र वाटते, की एवढी मोठी किंमत देण्याइतपत त्या मजेत विशेष थ्रिल नव्हतं." रस्त्यावर घडणाऱ्या बहुतांशी बलात्काराच्या घटना का घडतात याचे कारण या दोन प्रातिनिधिक मुलाखतीतून येऊ शकेल. ही सामाजिक विकृती दूर करणे हाच बलात्काराच्या प्रवृत्तीस आळा घालण्या प्रभावी मार्ग आहे. बलात्काराच्या गुन्ह्यांचा अलगपणे विचार करता येणार नाही. 'बलात्कार हा राष्ट्रावरील कलंक आहे' असा शाब्दि शेरा मारून भागणार नाही. ही अपप्रवृत्ती समाजातून दूर होईल या दृष्टी प्रयत्न करण्याची आवश्यकता आहे. बलात्काराचा गुन्हा करताना आरो समाजातील स्त्रीच्या शरीरावर तर अत्याचार करतोच पण मानवी हक्क वरही घाला घालतो. मानवी अधिकारांची प्रतिष्ठा राखणे हे सर्वोच्च कर्त आहे, याची जाणीव समाजात व्यापक प्रमाणात निर्माण केल्याविना सामाजि विकृती कमी होणार नाही.

अर्थात 'विकृती निर्मूलनासाठी सामाजिक प्रबोधन' ही फार लांब पल्ल्याची योजना आहे. तोपर्यंत महिलांवर अत्याचार करताना कामपिसाट थांबणार नाहीत. आपल्या या कृत्याचा परिणाम म्हणून समाजात आपणास

तर मिळणार नाहीच, पण हाडे खिळखिळी होण्याइतका चोप मात्र ी पडतो असा पदोपदी अनुभव येईल. इतकी जरब बलात्कारी इसमाला पाहिजे. याआधी बलात्कार विरोधी संघटनांचा उल्लेख केला आहे. महिलांची छेड काढणाऱ्यांना, त्यांच्यावर अत्याचार करणाऱ्यांना अशा संघ-नांची जरब बसू शकेल.

मध्यंतरी पुण्याच्या तरुण भारतमध्ये एका महिलेने आपला अनुभव केला होता. पुण्याच्या लक्ष्मी रोडला लागून असलेल्या एका काहीशा ा बोळातून सायंकाळच्या वेळी ही महिला एकटीच लगबगीने चालली ती. मागून तीनचार जणांचे एक टोळके अचकट विचकट बोलत तिच्या-वळ सरकण्याचा प्रयत्न करीत होते. भीतीने गाळण उडालेल्या या स्त्रीने आपला वेग वाढवला, तसा त्या टोळक्याचाही वेग वाढला. ती महिला लिहिते, "पण एकाएकी जवळून कुठून तरी प्रार्थनेचे स्वर ऐकू आले. नमस्ते सदा वत्सले... अंधुक प्रकाशात मी तिकडे पावले वळविली, आणि मागे वळून पाहिले. संघाच्पा प्रार्थनेचे ते स्वर कानांवर पडताच त्या टोळक्याने काढता पाय घेतला होता. मी तशीच मैदानावर पोचले. तेरा–चौदा वर्षांची मुले तेथे प्रार्थना म्हणत होती. संघशाखेवरील त्या लहान मुलांचाही गुंडांना वचक वाटला होता." या महिलेने दिलेला हा अनुभव खूपच बोलका आहे.

१७ सप्टेंबर १९८० च्या वर्तमानपत्रात प्रसिद्ध झालेल्या एका बातमी-चाही या ठिकाणी उल्लेख करता येईल. मुंबईच्या एका दूरच्या भागात एका मुलीस गाठून तिचा विनयभंग करू पाहणाऱ्या दोघाजणांना जागच्या-जागी पकडून त्यांना ठोक देऊन पोलिसांच्या तावडीत देणाऱ्या गणपत केळुसकर या इसमाचा आणि त्याच्या दोघा सहकाऱ्यांचा मुंबईच्या पोलिस आयुक्तांनी गौरव केल्याचे त्या बातमीत म्हटले होते. अशा गणपत केळुस-करांची संख्या वाढली की गुंडांना जरब आपोआपच बसू शकेल.

स्त्रियांनी स्वतः प्रतिकारक्षम होणे हा तर सर्वोत्तम मार्ग जिथे सा जीवनच उद्ध्वस्त होण्याचा धोका, तिथे प्राणांचे भय बाळगायचे कशासाठी? कोणत्याही स्त्रीच्या अंगावर हात टाकला, की ती शेवटपर्यंत निक प्रतिकार करते, हा अनुभव प्रत्यही येऊ लागला तरी महि करणारांना दहशत बसू शकेल. 'नारी–मुक्तीच्या

झटपट प्रसिद्धी पावू इच्छिणाऱ्या आमच्या सन्नारींनी स्त्रियांना प्रतिकारक्षम बनविण्याचा एखादा कार्यक्रम हाती घेणे आवश्यक आहे. अशी अनेक आघाडीवर एकाच वेळी बलात्कार विरोधी मोहीम हाती घ्यावी लागेल.

●

REFBK-0023083

मराठी ग्रंथ संग्रहालय ठाणे
संदर्भ शाखा (स्थळ प्रत)

विराट प्रकाशनाला
आमच्या शुभेच्छा

**ideal road builders**
**private limited**

*Office* : 510, Commerce House,
140, Medows Street,
Fort, Bombay – 400 023.
Phone : 273447 - 48

*Site* : Asphalt Plant, Chandivali Farm,
Chandivali Village,
Bombay – 400 072.
Phone : 58 50 50